सबसे 'तेज' ग्लोबल महातेज...!

# ग्लोबल महातेज

RNI. NO. MAHBIL /25/A0192

https://epaper.globalmahatej.com/

Postal Regd. No. JAL/443/2025-2027

वर्ष १ ले | अंक : ३२६ | बुधवार, दि. १९ ऑगस्ट २०२६ | पाने : ४ | अमळनेर | किंमत : ३ रुपये | Email - globalmahatej@gmail.com



रवि ज्वेलर्स
सराफ बाजार, अमळनेर.
मो. ७०७४७४२१२१
सोने-चांदी
आजचे भाव

| | |
|---|---|
| २४ सोने ९९.५०% | ₹ १५०७०० |
| २२ सोने ९१.६०% | ₹ १३९७०० |
| १८ Ct सोने ७५.००% | ₹ ११६५०० |
| शुद्ध चांदी ९९९% | ₹ २३७०/- |

भाव प्रती १० ग्राम








श्री. अभय सराफ
अमळनेर



श्री. अमित सैनानी
अमळनेर



श्री. निलेश पाटील
शिक्षक, अमळनेर



श्री. संदीप अहिरराव
अमळनेर



श्री. बाळासाहेब महाजन
माजी नगरसेवक, अमळनेर


# श्रावणमासानिमित्त श्री मंगळग्रह मंदिरात श्री सत्यनारायण महापूजा

## प्रा. श्री. भरतसिंग परदेशी सपत्नीक विशेष मानकरी; भाविकांनी घेतला दर्शन व तीर्थप्रसादाचा लाभ

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : श्रावणमासाच्या पावन पर्वानिमित्त दरवर्षीप्रमाणे यंदाही श्री मंगळग्रह मंदिरात आज मंगळवार, दि. १८ ऑगस्ट रोजी सकाळी श्री सत्यनारायण महापूजेचे भक्तिमय वातावरणात आयोजन करण्यात आले. मंगळग्रह सेवा संस्थेचे अध्यक्ष डॉ. डिगंबर महाले यांच्या मार्गदर्शनाखाली ही विशेष महापूजा विधिवत धार्मिक परंपरेनुसार झाली.

या महापूजेचे मानकरी प्रा. श्री. भरतसिंग परदेशी व नगरसेविका सौ. कल्पनाताई परदेशी या दाम्पत्याच्या शुभ हस्ते भगवान विष्णूंच्या सत्यनारायण स्वरूपाची विधिवत महापूजा तसेच सत्यनारायण कथाश्रवण व आरती आदी धार्मिक विधी झाले. श्रावण महिना हा हिंदू धर्मपरंपरेत अत्यंत पवित्र आणि आध्यात्मिक साधनेसाठी विशेष महत्त्वाचा मानला जातो. भगवान शिवजींच्या उपासनेसह या महिन्यात विविध धार्मिक अनुष्ठाने, व्रत-वैकल्ये, पूजा-अर्चा आणि सत्यनारायण महापूजेला विशेष धार्मिक महत्त्व आहे.

सत्यनारायण भगवानांची पूजा ही सत्य, श्रद्धा, सदाचार आणि कुटुंबाच्या मंगलमय जीवनासाठी प्रार्थना करण्याची पवित्र परंपरा मानली जाते. भक्तिभावाने केलेल्या या पूजेमुळे मनाला शांती, सकारात्मक ऊर्जा आणि ईश्वरचरणी समर्पणाची अनुभूती मिळते, अशी श्रद्धा आहे. मंदिराचे पुरोहित वैभव लोकाक्षी, जयेंद्र वैद्य व परशुराम शर्मा यांनी पौरोहित्य केले. त्यांना उमेश पाठक यांनी सहकार्य केले. या महापूजेच्या निमित्ताने मंदिर परिसरात सकाळपासूनच आध्यात्मिक व प्रसन्न वातावरण निर्माण झाले होते.

मंत्रोच्चार, धार्मिक विधी आणि भक्तिमय वातावरणामुळे मंदिर परिसर भाविकांनी गजबजून गेला. महापूजेनंतर उपस्थित भाविकांना तीर्थप्रसादाचे वाटप करण्यात आले. सकाळी ९ वाजेपासून रात्री १० वाजेपर्यंत श्री मंगळग्रह मंदिरात दर्शनासाठी आलेल्या भाविकांनी श्री मंगळग्रहाचे दर्शन घेतले तसेच तीर्थप्रसादाचा लाभ घेतला. श्रावणमासाच्या निमित्ताने मंदिरात दिवसभर भाविकांची वर्दळ राहिली. याप्रसंगी मंगळग्रह सेवा संस्थेचे उपाध्यक्ष एस. एन. बाविस्कर, सचिव सुरेश बाविस्कर यांच्यासह मंगल सेवेकरी, भाविक तसेच मंदिराचे सेवेकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



अमळनेर : श्रावणमासाच्या पावन पर्वानिमित्त श्री मंगळग्रह मंदिरात दरवर्षीप्रमाणे यंदाही मंगळवार, दि. १८ ऑगस्ट रोजी सकाळी श्री सत्यनारायण महापूजेचे भक्तिमय वातावरणात आयोजन करण्यात आले. यावेळी विधिवत श्री सत्यनारायण महापूजा करताना विशेष मानकरी प्रा. श्री. भरतसिंग परदेशी व नगरसेविका सौ. कल्पनाताई परदेशी.

# 'एसआयआर'सह वाढीव कामांचे मानधन द्या

## अमळनेर तालुका 'बीएलओं'च्या न्याय्य हक्क समितीची मागणी; प्रांताधिकाऱ्यांना निवेदन

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : 'एसआयआर'सह अनेकविध कामांच्या वाढत्या ताणासह विविध मागण्यांसाठी अमळनेर तालुका 'बीएलओ' न्याय्य हक्क समितीतर्फे सोमवार, दि. १७ ऑगस्ट रोजी प्रांताधिकारी मयूर भंगाळे यांना निवेदन देण्यात आले. या निवेदनात घरगणनेच्या कामाला 'बीएलओं'चा विरोध असल्याचे स्पष्ट करण्यात आले. तसेच अन्य मागण्या करण्यात आल्या. जिल्हाधिकाऱ्यांच्या दि. १४ ऑगस्ट २०२६ रोजीच्या पत्रात घरगणनेचे काम 'बीएलओं'नी करावे, असा स्पष्ट उल्लेख नसतानाही तसेच 'एसआयआर' कार्यक्रमाच्या वेळापत्रकातही घरगणनेचा उल्लेख नसताना पर्यवेक्षकीय यंत्रणेकडून 'बीएलओं'वर हे काम सोपविण्याचा प्रयत्न होत असल्याचा आरोप समितीने केला. त्यामुळे हे काम 'बीएलओं'कडून करून घेऊ नये, भारत निवडणूक आयोगाच्या आदेशानुसार ईआरओ व एईआरओ यांना अनुक्रमे ३० हजार व २५ हजार रुपये मानधन मंजूर करण्यात आले आहे. त्याच धर्तीवर 'बीएलओं'नाही योग्य मानधन देण्यात यावे. तसेच वरिष्ठ स्तरावरून वारंवार व अवेळी देण्यात येणारे आदेश केवळ कार्यालयीन वेळेत आणि लेखी स्वरूपात देण्यात यावेत, 'बीएलओं'ना वारंवार कारवाईच्या धमक्या देणे टाळावे, निवडणूक कामाचा अतिरिक्त भार लक्षात घेता एक वाढीव वेतनवाढ तसेच कामाच्या प्रमाणानुसार जनगणनेच्या धर्तीवर अर्जित रजा देण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली. या सर्व मागण्यांचा सहानुभूतीपूर्वक विचार करून आपल्या स्तरावरील मागण्या तातडीने मान्य कराव्यात तसेच वरिष्ठ स्तरावरील मागण्यांसाठी शासनाकडे पाठपुरावा करावा, अशी विनंती यावेळी करण्यात आली. निवेदनावर भगवान पाटील, राजेंद्र चौधरी, श्याम वाघ, अजय भामरे, दिनेश शिरसाठ, भूषण महाले, सुरेश वाडीले, जितेंद्र पाटील, नामदेव अहिरे, रवींद्र महाजन, आशिष राजपूत, प्रसाद जोशी, रियाज अहमद शेख, रामेश्वर भदाणे, ज्ञानेश्वर गांधलीकर, राजेंद्र पाटील, मकरंद निळे, उज्ज्वल मार्कंडेय, अतुल भोई, किरण ठाकर, अजय बोरसे, चंद्रकांत पाटील, विशाल साळुंखे, गोविंदा माळी, डॉ. कुणाल पवार, गिरीश पाटील, गणेश चव्हाण, प्रदीप सैंदाणे, प्रफुल्ल भदाणे, श्रीमती सुषमाताई तायडे, सौ. कविताताई पाटील, सौ. मनीषाताई पाटील, विकास चौधरी, जगदीश शि. पाटील, सुधीर चौधरी, हर्षल सोनवणे, संजीव पाटील, प्रेमराज पवार, सागर महाजन, ज्ञानेश्वर भदाणे, राहुल महाजन, राहुल पाटील, भटेश्वर भदाणे, भरत पाटील, जयेश लोहार, नरेश पाटील, प्रशांत कापडणे, सुधीर पाटील, भूपेंद्र वानखडे, गुलाब बोरसे, सुमेध मोहिते, महेंद्र रत्नपारखी, चिंतामण धनके, धीरज कोठवाल, प्रदीप पाटील, कैलास बाविस्कर, जितेंद्र वाणी, विनीत कुळकर्णी, राहुल देसले, अजय महाजन, म. आसिम अ. नईम, विनोद भदाणे, दिनेश कार्लेकर, विकास पाटील, जयवंत पाटील, ज्ञानेश्वर मोरे, आर. आर. पाटील, राहुल महाजन, नंदलाल पाटील, अरविंद भामरे, विनोद पाटील, महेश बोरसे यांच्यासह शेकडो बीएलओंच्या स्वाक्षऱ्या आहेत. वरील मागण्यांसंदर्भात सहानुभूतीपूर्वक विचार करून वरिष्ठ पातळीवर योग्य तो पाठपुरावा करण्याचे आश्वासन यावेळी प्रांताधिकारी भंगाळे यांनी दिले. याप्रसंगी निवडणूक विभागाचे नायब तहसीलदार प्रशांत धमके उपस्थित होते.



अमळनेर : 'एसआयआर'सह अनेकविध कामांच्या वाढत्या ताणासह विविध मागण्यांसाठी अमळनेर तालुका 'बीएलओ' न्याय्य हक्क समितीतर्फे सोमवार, दि. १७ ऑगस्ट रोजी प्रांताधिकारी मयूर भंगाळे यांना निवेदन देण्यात आले.

# 'व्हॉईस ऑफ मीडिया'चे राष्ट्रीय कार्याध्यक्ष डॉ. डिगंबर महाले यांचा आज सन्मान

## अमळनेरमधील विविध सामाजिक व सांस्कृतिक संघटनांतर्फे भव्य सत्कार सोहळ्याचे आयोजन

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : आंतरराष्ट्रीय स्तरासह ७४ देशांमध्ये कार्यरत असलेल्या 'व्हॉईस ऑफ मीडिया' या पत्रकार संघटनेच्या राष्ट्रीय कार्याध्यक्षपदी नुकतीच येथील ज्येष्ठ पत्रकार डॉ. डिगंबर महाले यांची निवड झाली. त्याबद्दल शहरातील विविध सामाजिक व सांस्कृतिक व पुरोगामी संघटनांतर्फे बुधवार, दि. १९ ऑगस्ट २०२६ रोजी सायंकाळी सहा वाजता पिंपळे रोडवरील विठ्ठलनगरातील अभ्यासिका अर्थात प्रा. अशोक पवार यांच्या निवासस्थानी भव्य सत्कार सोहळा आयोजित करण्यात आलेला आहे.



पत्रकारिता व सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या डॉ. महाले यांची 'व्हॉइस ऑफ मीडिया'च्या राष्ट्रीय कार्याध्यक्षपदी निवड झाल्याने अमळनेरच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा खोवला गेला आहे. या निवडीबद्दल विविध सामाजिक, सांस्कृतिक व पुरोगामी संघटनांतर्फे त्यांचा सत्कार करून अभिनंदन केले जाणार आहे. या सत्कार सोहळ्याचे आयोजक युवा कल्याण प्रतिष्ठान, मराठा सेवा संघ, बहुजन समाज पार्टी, मौर्य क्रांती संघ महाराष्ट्र राज्य, बहुजन क्रांती मोर्चा, राष्ट्र सेवा दल, महिला पतंजली योग समिती महाराष्ट्र पूर्व, अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषद, राष्ट्रीय कला मंच, पुरोगामी क्रांती दल तसेच अल्लामा फजले हक खैराबादी स्टडी सेंटर अॅण्ड पब्लिक लायब्ररी, अमळनेर हे आहेत. या कार्यक्रमास शहरातील सामाजिक, शैक्षणिक, पत्रकारिता, सांस्कृतिक व राजकीय क्षेत्रातील सर्व मान्यवरांसह नागरिक, हितचिंतकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून डॉ. महाले यांना शुभेच्छा द्याव्यात, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# मोटारसायकलचोराला पोलिसांकडून अटक

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील तहसील कार्यालयातून मोटारसायकल चोरून नेणाऱ्या कळमसरे येथील एका चोरट्याला पोलिसांनी अटक केली. चोपडा तालुक्यातील वडोदा येथील एका चोरट्याला दोन मोटारसायकलींसह अटक केल्यानंतर पोलीस निरीक्षक दत्तात्रय निकम यांच्या पथकाने कळमसरे येथील राहुल परशुराम कोळी (वय २२) यास तांत्रिक मुद्यांच्या आधारावर अटक केली आहे. १० ऑगस्ट रोजी दुपारी ३ ते ४ दरम्यान प्रदीप संतोष पाटील (वय ४४, रा. गणेश कॉलनी) यांची ४० हजार रुपये किमतीची मोटारसायकलचा (एमएच १९- सीएस ८५०५) हँडल लॉक करून तहसील कार्यालयात लावलेली मोटारसायकल चोरीस गेली होती. पोलिसांनी तांत्रिक मुद्यांच्या आधारावर चोरट्याला शोधून अटक केली. त्याच्याकडून आणखी काही मोटारसायकली सापडण्याची शक्यता आहे. हवालदार प्रशांत पाटील तपास करीत आहेत.

# सराफ बाजारात चालले तरी काय?

## चांदीची हाराकिरी, सोन्याच्या दराने घेतला यू-टर्न; उच्च भावांमुळे ग्राहकांचा हात आखडता

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

आठवड्याच्या सुरूवातीला वाढ झाल्यानंतर मंगळवार, दि. १८ ऑगस्ट रोजी आंतरराष्ट्रीय आणि देशांतर्गत बाजारात सोन्या-चांदीच्या दरात मोठी घसरण नोंदविली जात आहे. या आठवड्याची सुरूवात सोने आणि चांदीच्या किमतींमधील मोठ्या वाढीने झाली. सोमवार, दि. १७ ऑगस्ट रोजी आंतरराष्ट्रीय बाजारात आणि सराफ बाजारातही दिसून आली, पण मंगळवारी आंतरराष्ट्रीय बाजारात सोने आणि चांदी या दोन्हींच्या किमतींमध्ये लक्षणीय घट झाली ज्यामुळे भारतीय बाजारातील दोन्ही मौल्यवान धातूंवर दबाव वाढला.

श्रावण महिना सुरू होताच सणासुदीचे दिवस सुरू होतात आणि त्यासोबतच सराफ बाजारात खरेदीची लगबग सुरू झाली आहे. पण यावेळी वाढत्या किमतीमुळे सर्वसामान्य ग्राहकांचा हात आखडता आहे. देशांतर्गत सराफा तसेच MCX (फ्युचर्स मार्केट) वर सोन्या-चांदीच्या किमतींनी अलीकडच्या



दिवसांत दरवाढीचा आलेख उंचावत ठेवला असताना आगामी सणासुदीच्या दिवसांत वाढ होण्याची चिन्हे दिसत आहेत.

**सोने-चांदीचा आजचा दर**

मंगळवार, दि. १८ ऑगस्ट रोजी सकाळच्या सत्रात MCX वर सोने-चांदीच्या दरात घट नोंदविली गेली आहे. बाजारातील सहभागींचे लक्ष आता फेडच्या व्याजदर आऊटलूक आणि सोन्याच्या पुढील हालचालीबद्दल अधिक संकेत मिळविण्यासाठी या आठवड्यातील FOMC बैठकीच्या मिनिट्सवर केंद्रित असेल. गेल्या वर्षभरात सोन्याच्या किमतीत ५६.७६ टक्के आणि चांदीच्या दरात १०९.५४ टक्के इतकी मोठी वाढ झाल्यामुळे मौल्यवान धातूंचे दर गुंतवणूकदार आणि ग्राहक या दोघांच्याही विशेष लक्षवेधी ठरले. मल्टी कमोडिटी एक्सचेंजवर मंगळवारी सकाळी सोन्याचा वायदा ०.५१ टक्के किंचित घसरणीसह एक लाख ५५ हजारांच्या आसपास व्यवहार करीत आहे, तर चांदीचे फ्युचर्स ०.९४ टक्के कमी होऊन दोन लाख ३५ हजार रुपये किलोवर घसरले आहेत. तसेच देशातील सराफ बाजारांमध्ये २४ कॅरेट शुद्धतेच्या १० ग्रॅम सोन्याची किंमत एक लाख ५५ हजार ६७० रुपये आहे, तर २२ कॅरेट सोने एक लाख ४२ हजार ७१० रुपये १० ग्रॅम आणि १८ कॅरेट सोन्याचा भाव एक लाख १६ हजार ७७० रुपये १० ग्रॅम इतका आहे.

गेल्या आठवड्यात अमेरिकेतील कमजोर आर्थिक आकडेवारीमुळे फेडरल रिझर्व्हकडून अधिक कठोर चलनविषयक गुंतवणूकदारांच्या धोरणाच्या अपेक्षांना धक्का बसला. अपेक्षेपेक्षा कमजोर चलनवाढ, रोजगार आणि किरकोळ विक्रीच्या आकडेवारीमुळे सोन्याला फायदा झाला. ज्यामुळे डॉलरवर दबाव आला.

# सोने पुन्हा दोन लाखांवर जाणार?

## तज्ज्ञांनी व्यक्त केला अंदाज; चांदीचा दर नवा उच्चांक गाठणार

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

गेल्या २४ तासांत सोन्या-चांदीच्या दरात तेजी कायम राहिली आहे. अमेरिकेतील व्याजदरांबाबत नरमाईची शक्यता, डॉलरची घसरण आणि जागतिक पातळीवरील अनिश्चिततेमुळे सोन्याच्या दरात वाढ होताना पाहायला मिळत आहे. शेअर बाजाराला सुरूवात होताच २४ कॅरेट सोन्याचा दर १० ग्रॅममागे एक लाख ५६ हजार रुपयांवर पोहोचला आहे. तर चांदीचा दर प्रतिकिलो दोन लाख ३९ हजार रुपयांच्या जवळ पोहोचला आहे.

आंतरराष्ट्रीय बाजारात सोमवार, दि. १७ ऑगस्ट रोजी सोन्याच्या दरात जवळपास एक टक्का वाढ झाली. त्यानंतर मंगळवार, दि. १८ ऑगस्ट रोजी सोन्याच्या दरात वाढ कायम दिसून येत आहे. चांदीच्या दरातही वाढ होताना पाहायला मिळत आहे. अमेरिकेतील महागाई आणि रोजगाराशी संबंधित काही आकडेवारीनंतर फेडरल रिझर्व्हकडून व्याजदरांबाबत नरम भूमिका घेतली जाऊ शकते, अशी अपेक्षा वाढली आहे. गुंतवणूकदारांचा कल सोन्याकडे वाढला आहे. डॉलर घसरत असल्याने इतर चलनांमध्ये सोन्याची खरेदी तुलनेने स्वस्त होते. त्यामुळे आंतरराष्ट्रीय बाजारात सोन्याची मागणी वाढण्याची शक्यता आहे. सोन्या-चांदीच्या दरासाठी आगामी काळात अमेरिकेच्या फेडरल रिझर्व्हची भूमिका महत्त्वाची ठरणार आहे. व्याजदर कपातीची शक्यता वाढली, तर सोन्याच्या दरात आणखी वाढ होऊ शकते. जागतिक पातळीवरील भू-राजकीय तणाव कायम राहिल्यासही सोन्याकडे सुरक्षित गुंतवणूक म्हणून पाहिले जाऊ शकते. त्यामुळे सोन्याच्या दरात आणखी वाढीची शक्यता तज्ज्ञ व्यक्त करत आहेत. मात्र, डॉलरमध्ये अचानक मजबुती आली किंवा अमेरिकेच्या व्याजदरांबाबत अपेक्षेच्या विरोधात निर्णय झाला, तर सोन्या-चांदीच्या दरावर दबाव येऊ शकतो.

### चांदीच्या दरातही तेजी

औद्योगिक मागणी आणि गुंतवणुकीची मागणी या दोन्हीमुळे चांदीच्या दरालाही आधार मिळत आहे. त्यामुळे सोन्यासोबत चांदीच्या दरातही तेजी कायम राहण्याची शक्यता आहे. मात्र, चांदीमध्ये सोन्याच्या तुलनेत अधिक चढ-उतार होऊ शकतात.


गर्व से कहो स्वदेशी है हम...!
स्वदेशी ही खरिदेंगे हम...!!

स्वातंत्र्यपूर्व संग्रामातील स्वदेशीची हाक आता पुन्हा देवू या. नवरात्रोत्सवात आपण आदिमाया आदिशक्तीचा जागर करतो त्याप्रमाणेच स्वदेशीचाही जागर करूया..! सच्च्या भारतीयांवर जेव्हा-जेव्हा परकीय आक्रमण होते तेंव्हा-तेंव्हा ते प्रचंड त्वेषाने पेटून उठतात...!! आता तीच वेळ येऊन ठेपली आहे...!!!

जय भारत...!
जय स्वदेशी...!!

## संपादकीय

# युवकांच्या सुरक्षित भविष्यासाठी

लाल किल्ल्यावरून पंतप्रधान मोदींनी केलेल्या भाषणात अपेक्षेप्रमाणे देशातील युवाशक्तीचा विशेषत्वाने उल्लेख झाला. त्यातले दोन मुद्दे हे युवकांच्या आणि देशाच्या भवितव्याचा वेध घेणारे होते. आणि एक मुद्दा हा देशाच्या अंतर्गत सुरक्षिततेविषयी युवकांनाच जागृत करणारा होता. नुकत्याच झालेल्या विद्यार्थी आंदोलनाचे पडसाद पंतप्रधानांच्या भाषणातून उमटणे स्वाभाविक होते. ज्या कारणांमुळे देशातला युवक वेठीला धरला जातो. ती कारणं म्हणजे प्रामुख्याने वेगवेगळ्या परीक्षांसाठी किंवा शिक्षण व्यवस्थेमध्ये कोचिंग क्लासेसचे वाढत असलेले प्राबल्य हे अधिक चिंताजनक ठरते आहे. तर येणाऱ्या कृत्रिम बुद्धीमत्ता युगाचा विचार करून भारतातील युवकांना आपल्या बौद्धिक गुणवत्तेतून चांगल्या संधी उपलब्ध व्हाव्यात म्हणून या तंत्रज्ञानात अधिकाधिक संधी देण्याचा विचार व्यक्त झाला. भारत हा लोकसंख्येच्या दृष्टीकोनातून सर्वात मोठा देश ठरतो. म्हणूनच भारतीय युवकांनी आगामी काळातल्या एआय तंत्रज्ञान संशोधनात मोठी भूमिका पार पाडावी असा त्यामागचा उद्देश आहे आणि म्हणूनच तब्बल एक लाख कोटींचा स्वतंत्र निधी त्यासाठी राखून ठेवला जाणार आहे. विद्यार्थ्यांच्या अभ्यासक्रमामध्ये शाळा, महाविद्यालयं किंवा शिक्षण संस्थांची भूमिका महत्त्वाची असतेच. परंतु सध्याच्या काळात शिक्षण संस्था आणि कोचिंग क्लासेस यांचेच संगनमत होऊन एक वेगळीच समांतर शिक्षण व्यवस्था उभी राहते आहे. जी प्रामुख्याने कोचिंग क्लासेसवर अवलंबून आहे. कोचिंग क्लास उघडण्यासाठी कोणत्याही अधिकृत परवानगीची गरज नसते. तरीदेखील शिक्षण संस्थांमध्ये शिकवल्या जाणाऱ्या अभ्यासक्रमावर क्लासेस चालवून कोट्यवधीचा पैसा गोळा केला जातो. गेल्या काही वर्षांत अनेक शिक्षण संस्था विशेषतः दहावीनंतरचे शिक्षण हे कोचिंग क्लासवाल्यांशी संलग्न करतात. आणि शाळा या केवळ परीक्षा घेण्यापुरतीच भूमिका बजावतात. आपल्या क्लासचा व्यवसाय वाढावा याकरीता क्लास चालकांकडून वेगवेगळ्या प्रकारचे फंडे वापरले जातात. आणि त्यातूनच पेपरफुटीसारख्या घटना घडतात. अर्थात त्याला काही प्रमाणात सरकारी अधिकारीदेखील जबाबदार आहेत.

आता या कोचिंग क्लासेसच्या मक्तेदारीची नाकेबंदी करणारी घोषणा पंतप्रधानांनी केली आणि सरकारतर्फेच ऑनलाईन कोचिंगची व्यवस्था उभी करण्याचा त्यांनी निर्णय घेतला आहे. हा निर्णय प्रत्यक्षात केव्हा आणि कसा येईल हे स्पष्ट झालेले नाही. परंतु प्रत्येक छोट्या छोट्या गावांपासून ते शहरांपर्यंत कोचिंग क्लासेसची एक प्रचंड साखळी उभी राहिलेली आहे. त्यातून विद्यार्थ्यांना अधिक अभ्यास करण्याचा सराव घडून येतो. परंतु अलिकडच्या काळात हे कोचिंग क्लासेस एखाद्या कॉर्पो रेट कंपन्यांप्रमाणे चालवले जात आहेत. लाखो रुपयांची फी घेतली जाते. म्हणजे त्यांच्याकडून दिल्या जाणाऱ्या शिक्षणाच्या तुलनेमध्ये आकारल्या जाणाऱ्या फी चे प्रमाण जास्त असते. ज्यात सामान्य किंवा गरीब विद्यार्थ्यांना एकाअर्थी डावलण्याचाच प्रकार ठरतो. आपला कोचिंगचा धंदा अधिक तेजीत चालावा म्हणून प्रश्नपत्रिका फोडण्याची कारस्थाने होऊ लागली आहेत. त्याला पायबंद घालण्याच्या उद्देशाने ही उपाययोजना केली जाते आहे. आता या योजनेचे यश तिच्या अंमलबजावणीवर अवलंबून असेल यात काही शंका नाही. युवकांच्या संदर्भातला हा एक महत्त्वाचा विचार मांडला गेला तर एआय तंत्रज्ञानाच्याबाबतीत सरकारने पुन्हा मोठा निधी एआय तंत्रज्ञानाच्या संशोधनावर खर्च करण्याचा निर्णय घेतला आहे. म्हणजेच भविष्यकाळात शिक्षण व्यवस्थेमध्ये एआय तंत्रज्ञानाची खूप महत्त्वपूर्ण भूमिका राहणार आहे. ते हे तंत्रज्ञान तितक्याच चांगल्या पद्धतीने भारतात विकसित झाले पाहिजे. त्याची ही पूर्वतयारी म्हणता येईल. अर्थातच योग्य पद्धतीने जर संशोधनाला वाव दिला तर जागतिक पातळीवरसुद्धा भारत हा एआय तंत्रज्ञानात महत्त्वाचे योगदान देऊ शकेल यात काही शंका नाही. देशाच्या स्वातंत्र्याचा विचार करत असताना सर्वाधिक संख्येने असलेल्या युवकांशी संबंधित या दोन महत्त्वाच्या मुद्यांचा सरकारने केलेला विचार काळाप्रमाणे आवश्यक ठरतो. मात्र त्याच्या अंमलबजावणीची तितकीच जबाबदारी सरकारला स्वीकारावी लागणार आहे. कारण आज अनेक सरकारी कार्यालयांमध्येसुद्धा तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर होत नाही. अनेकवेळेला अनेक ठिकाणचे सर्व्हर डाऊन होण्याचे प्रकार घडतात. म्हणूनच त्याच्या अंमलबजावणीवर या योजनांचे महत्त्व अवलंबून असेल.

युवकांशीच संबंधित आणखी एक महत्त्वाचा मुद्दा म्हणजे देशातील तरुणांमधला आत्मविश्वास कसा वाढेल त्याला प्राधान्य देऊन युवकांचे भविष्य सुरक्षित करण्याची आवश्यकता आहे. आज ज्या पद्धतीने सरकारला मादक पदार्थविरोधी मोहीम राबवावी लागते आहे किंवा देशाच्या अनेक भागांतल्या तरुणांना आपल्या जाळ्यात ओढण्याची छुपी कारस्थाने होत आहेत. या गोष्टींकडे लक्ष देण्याची वेळ आलेली आहे. आज प्रत्येक महानगराच्या शिक्षण संस्थांच्या आणि हॉस्टेल्सच्या आजुबाजूचे वातावरण कमालीचे बदलले आहे. अर्वाच्च भाषेपासून ते विचित्र व्यसनांपर्यंत या तरुण पिढीला आपल्या विळख्यात ओढण्याचा प्रयत्न होतो आहे. गेली पन्नास वर्षे भारतात ठाण मांडून बसलेला दहशतवाद आणि नक्षलवाद याच तरुणांना वेठीला धरून वाढवला गेला. काश्मीरमध्ये तर तरुणांना पैसे देऊन दगडफेक करायला लावली जात होती. आणि आता जगातील सर्वाधिक मादक पदार्थांची तस्करी भारतात होऊ लागलेली आहे. गेल्या पाच वर्षांमध्ये तब्बल एक लाख कोटींची मादक पदार्थांची तस्करी पकडली गेली. आणि सगळ्याच महानगरांमध्ये तरुणांमध्ये वाढत असलेल्या व्यसनाधिनतेने धोक्याची पातळी ओलांडलेली आहे. वेगवेगळ्या पद्धतीने या तरुणांच्या बुद्धीला भटकवण्याचे प्रयत्न होत आहेत. जी युवाशक्ती समाजासाठी आणि देशासाठी खूप मोठे सकारात्मक योगदान देऊ शकते. तिच्यामध्ये नकारात्मक बुद्धी वाढवण्याचे जाणीवपूर्वक प्रयत्न होत आहेत. या सर्व गोष्टी युवकांचे भवितव्य असुरक्षित करणारे ठरतात. त्या दिशेनेसुद्धा सरकारने आपल्या प्रयत्नांचे प्रमाण वाढवण्याची आवश्यकता आहे.

# आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षणाला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

## अनिरुद्ध अ‍ॅकॅडमी ऑफ डिझास्टर मॅनेजमेंट आणि पंडित नेहरू समाजकार्य महाविद्यालयाचा संयुक्त उपक्रम

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील अनिरुद्ध अ‍ॅकॅडमी ऑफ डिझास्टर मॅनेजमेंट आणि पंडित जवाहरलाल नेहरू समाजकार्य महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षणाला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. प्रशिक्षणाच्या पहिल्या दिवशी आपत्ती व्यवस्थापन, प्रथमोपचार व सीपीआरचे प्रात्यक्षिकांसह प्रशिक्षण देण्यात आले.

संस्थेच्या संचालिका सौ. अनुरूपाताई भांडारकर अध्यक्षस्थानी होत्या. प्राचार्य डॉ. पी. एस. पाटील, प्रा. डॉ. जगदीश सोनवणे, प्रा. डॉ. सागराज चव्हाण, प्रा. डॉ. अस्मिताताई सर्वया, प्रा. डॉ. भरत खंडागळे व ग्रंथपाल उदय महाजन यावेळी उपस्थित होते.

पहिल्या सत्रात नंदुरबारचे आशिष वाणी यांनी 'आपत्ती आणि आपत्ती व्यवस्थापन' विषयावर मार्गदर्शन केले. धुळे येथील डॉ. धनश्री साळुंखे यांनी प्रथमोपचार व सीपीसीआरचे प्रशिक्षण दिले. यामध्ये रक्तस्त्राव थांबविणे, भाजणे, फ्रॅक्चर, विजेचा धक्का, सीपीआर, बचाव तंत्र, स्ट्रेचर तयार करणे, दोरीच्या गाठी, अग्नीशमन व सुरक्षित स्थलांतर आदींचे प्रात्यक्षिक देण्यात आले. प्रशिक्षण पूर्ण करणाऱ्यांना 'डिझास्टर मॅनेजमेंट व्हॉलेंटियर' म्हणून ओळख मिळणार असून, सहभागी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देण्यात आले. प्रशिक्षण विनामूल्य असून सर्वसामान्य नागरिकांनाही सहभागी होता येणार आहे.

प्रा. डॉ. अनिताताई खेडकर व प्रा. धनराज ढगे यांनी प्रशिक्षणाचे समन्वय केले. ज्योतीताई सोनार, कोमलताई सूर्यवंशी व महेश शेलार यांनी सहकार्य केले. प्रशिक्षणात विद्यार्थी व प्राध्यापक मिळून ६५ जण सहभागी झाले. प्रशिक्षण यशस्वितेसाठी वसंतसिंह पाटील, डॉ. संजीवसिंह चव्हाण, डॉ. अंजलीताई चव्हाण, स्वप्नीलसिंह मोरे, प्रशांतसिंह लगरे व सौ. मोनालीताई पाटील यांचे सहकार्य लाभले. ▲



*अमळनेर : येथील अनिरुद्ध अ‍ॅकॅडमी ऑफ डिझास्टर मॅनेजमेंट आणि पंडित जवाहरलाल नेहरू समाजकार्य महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षणावेळी बोलताना विद्यार्थिनी. व्यासपीठावर संस्थेच्या संचालिका सौ. अनुरूपाताई भांडारकर, प्राचार्य डॉ. पी. एस. पाटील, प्रा. डॉ. जगदीश सोनवणे, प्रा. डॉ. सागराज चव्हाण, प्रा. डॉ. अस्मिताताई सर्वया, प्रा. डॉ. भरत खंडागळे व ग्रंथपाल उदय महाजन आदी.*

# तालुका विज्ञान मेळाव्यांतर्गत स्पर्धेत मयुरी महाजन प्रथम

## मोहक साळुंखे द्वितीय, तर सोहम भोसले याने पटकावला तृतीय क्रमांक

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : समग्र शिक्षा, जिल्हा परिषद गटसाधन केंद्र पंचायत समिती, अमळनेर यांच्या वतीने नुकताच अखिल भारतीय विद्यार्थी विज्ञान मेळावा घेण्यात आला. त्यात 'भारतीय ऊर्जा क्षेत्र २०४७ : भवितव्य, संधी व आव्हाने' या विषयावर घेण्यात आलेल्या स्पर्धेत तालुक्यातील विविध शाळांमधील विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. गटशिक्षणाधिकारी प्रमोद पाटील स्पर्धेचे अध्यक्ष, साने गुरुजी नूतन माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक सुनील पाटील उद्घाटक, तर साने गुरुजी कन्या हायस्कूलच्या मुख्याध्यापिका सौ. अनिताताई बोरसे व डी. ए. धनगर प्रमुख पाहुणे होते.

सौ. नंदाताई पाटील व आकाश पाटील हे परीक्षक होते. स्पर्धेत सहभागी प्रत्येक विद्यार्थ्याला आपले विचार मांडण्यासाठी सहा मिनिटे वेळ देण्यात आला होता. विषयाचे गांभीर्य, मांडणी, अभ्यासपूर्ण विवेचन आणि प्रभावी वक्तृत्व यामुळे स्पर्धा अत्यंत चुरशीची झाली. स्पर्धेत डी. आर. कन्या हायस्कूलची विद्यार्थिनी मयूरी संदीप महाजन हिने प्रथम क्रमांक पटकावला. साने गुरुजी नूतन माध्यमिक विद्यालयाच्या मोहक मुकेश साळुंखे याने द्वितीय, तर पीबीए इंग्लिश मीडियम स्कूलच्या सोहम अमोल भोसले याने तृतीय क्रमांक मिळविला.

एस. एस. पाटील हायस्कूल, लोंढवेच्या जयेश निंबा पाटील याची उत्तेजनार्थ पारितोषिकासाठी निवड झाली. मेळाव्याच्या समारोपप्रसंगी गटशिक्षणाधिकारी पाटील, अमळनेर शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव संदीप घोरपडे, मुख्याध्यापक सुनील पाटील, मुख्याध्यापिका सौ. बोरसे व डी. ए. धनगर उपस्थित होते. यावेळी विद्यार्थी, शिक्षक व परीक्षकांनी मनोगत व्यक्त केले. विज्ञान मंडळाचे अध्यक्ष निरंजन पेंढारे यांनी कार्यक्रमासाठी सहकार्य केले.

विजेत्या विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते पारितोषिके प्रदान करण्यात आली. विज्ञान शिक्षक दीपक महाजन, वैशाली पाटील, हर्षल पवार, भारती पाटील, एन. डी. पाटील, एस. एस. कसबे व डिंपल देसाई यांच्यासह शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी कार्यक्रम यशस्वितेसाठी परिश्रम घेतले. भाग्यश्री वानखेडे यांनी सूत्रसंचालन केले. यशोदीप बागल यांनी आभार मानले. ▲



*अमळनेर : समग्र शिक्षा, जिल्हा परिषद गटसाधन केंद्र पंचायत समिती, अमळनेर यांच्या वतीने नुकताच अखिल भारतीय विद्यार्थी विज्ञान मेळावा घेण्यात आला. यावेळी घेण्यात आलेल्या स्पर्धेतील सहभागी विद्यार्थ्यांसमवेत गटशिक्षणाधिकारी प्रमोद पाटील, अमळनेर शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव संदीप घोरपडे, मुख्याध्यापक सुनील पाटील, मुख्याध्यापिका सौ. अनिताताई बोरसे व डी. ए. धनगर, विज्ञान मंडळाचे अध्यक्ष निरंजन पेंढारे आदी.*




*अमळनेर : येथील साने गुरुजी विद्यालयात रविवार, दि. १६ ऑगस्ट रोजी खानदेशचे सुपुत्र व बासरीवादक योगेश पाटील (एरंडोल) यांच्या मार्गदर्शनाखाली गुरुवंदना सादर करताना प्रशांत कुलकर्णी (नेपानगर), वैदेही पुराणिक (अमेरिका), विवेक गुरव, तुषार पुराणिक, योगेश संदानशीव, डॉ. दिव्यल चौधरी आदी.*


# साने गुरुजी विद्यालयात सुरेल गुरुवंदना

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील साने गुरुजी विद्यालयात रविवार, दि. १६ ऑगस्ट रोजी खानदेशचे सुपुत्र व बासरीवादक योगेश पाटील (एरंडोल) यांच्या मार्गदर्शनाखाली गुरुवंदना कार्यक्रम झाला. योगेश पाटील हे गेल्या अनेक वर्षांपासून खानदेशसह महाराष्ट्र व देशभरात बासरीवादनाचा प्रसार करून विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देत आहेत. कार्यक्रमाच्या प्रारंभी प्रशांत कुलकर्णी (नेपानगर) यांनी मंत्रपुष्पांजलीने गुरुपूजन केले. त्यानंतर विविध शिष्यांनी राग भूपाली, यमन, वृंदावनी सारंग, दुर्गा, बिहाग, शिवरंजनी यांसह भजने व चित्रपटगीतांचे बासरीवादन सादर केले. वैदेही पुराणिक (अमेरिका) यांनी राग शिवरंजनी सादर करून विशेष आकर्षण ठरविले. सर्व शिष्यांनी एकत्रित राग भूपाली सादर करून गुरुवंदना केली. तबलावादक विवेक गुरव यांनी साथसंगत केली, तर तुषार पुराणिक यांचे सोलो तबलावादन झाले. कार्यक्रमाच्या शेवटी योगेश पाटील यांनी राग पुरिया धनाश्रीचे शास्त्रीय बासरीवादन सादर केले. त्यांना योगेश संदानशीव यांनी तबल्यावर व डॉ. दिव्यल चौधरी यांनी तानपुरावर साथ दिली. यावेळी महाराष्ट्र साहित्य परिषदेचे अध्यक्ष भैयासाहेब देशमुख यांनी बासरीचा अध्यात्म व योगाशी असलेला संबंध स्पष्ट केला. डॉ. दिव्यल चौधरी यांनी साकारलेला 'शिष्य परिवार वृक्ष' हा गुरू-शिष्य परंपरेचा अनोखा आविष्कार ठरला. संदीप घोरपडे, निलेश सोनवणे व गोपाल बडगुजर यांनी मनोगत व्यक्त केले. विलेश राजपूत व हरिश पाटील यांनी सूत्रसंचालन केले. कार्यक्रमास पालक, नागरिक व संगीतप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते. ▲

# चाकोरीबाहेरील संगीतकार!

संपूर्ण कारकीर्दीत हाताच्या बोटावर मोजता येतील एवढे सिनेमे करताना त्यांनी वेगळेपणाची व दर्जा राखून ठेवणारी वाट शांतपणे जोपासली. त्यांचे के. एल. सैगल बनण्याचे स्वप्न होते म्हणून गाण्याचा रियाज केला होता. पं. हुस्नलाल-भगतराम व त्यांचे बंधू पंडित अमरनाथ यांच्याकडे संगीताची दीक्षा घेतली होती. शिवाय लाहोर येथील गुरू व संगीतकार जी. ए. चिश्ती बाबा यांच्याकडे देखील प्राथमिक संगीताचे धडे घेतले होते. या पार्श्वभूमीवर त्यांना गायिका जोहराबाई अंबालेवालीसोबत (रोमिओ अँड ज्युलिएट-१९४७) एक युगल गीत गायची संधी मिळाली होती. पण चित्रपटसृष्टी त्यांना वेगळ्या संधीसाठी खुणावत होती. त्यांनी 'शर्माजी' या नावाने संगीतकार म्हणून सुरूवात केली होती. त्यानंतर त्यांनी रहमान वर्मा व अजीज खान यांना सोबत घेऊन 'शर्माजी-वर्माजी' जोडी बनविली. मग त्यांनी 'हीर-रांझा' (१९४८), 'बीवी' (१९५०) व 'प्यार की बाते' (१९५१) या चित्रपटांना संगीत दिले. खरे म्हणजे त्याकाळी सिनेसृष्टीत पं. हुस्नलाल-भगतराम ही जोडी सुप्रसिद्ध होती. त्यांच्यानंतर 'शर्माजी-वर्माजी' ही संगीतकार जोडी दुसरी होती, तर तिसरी जोडी 'शंकर-जयकिशन' ही नावारूपास आली होती (बरसात - १९४९).
हा गायक व प्रसिद्ध हळवा संगीतकार म्हणजे शर्माजी ऊर्फ मोहम्मद जहूर खय्याम हाश्मी ऊर्फ 'खय्याम'.
आज दि. १९ ऑगस्ट रोजी त्यांच्या पुण्यतिथीनिमित्त त्यांच्या संगीत कारकीर्दीचा घेतलेला धांडोळा.
'फूटपाथ' (१९५३) या चित्रपटाचे दिग्दर्शक झिया सरहदी साहेब व शेठ चंदुलाल शहा यांनी एकदा दरडावून खय्यामजींना विचारले, की 'असली नाम क्या है तुम्हारा?' तेव्हा त्यांनी सांगितले, 'मोहम्मद जहूर खय्याम हाश्मी.' हे नाव फार मोठे असल्याने शेठला ते खटकले. त्यावर ते म्हटले, 'खय्याम ये नाम लिखो आजसे.' या चित्रपटापासूनच त्यांचे नाव 'खय्याम' हे प्रचलित झाले. अशा रीतीने स्वतंत्र संगीतकाराचा प्रवास सुरू झाला. वेगळेपण, चाकोरी सोडण्याचे धाडस, हे त्यांच्या चालींचे वैशिष्ट्य होते. खय्याम म्हणायचे, की "जिथे कथानकाचा विषय मला अपील झालेला नसायचा तेथे मी तो सिनेमा सोडून चालता व्हायचो. संगीतकाराने स्वतःच्या अटी व शर्तीनुसार काम केले तरच तो स्वतःला कथानकात झोकून देत. सिच्युएशननुसार उत्तमोत्तम चाली निर्माण करू शकतो!" उदाहरणार्थ- 'बरसात की रात' सिनेमाचा विषय त्यांना आवडला होता. त्यांनी सायनिंग अमाऊंट देखील घेतली होती. निर्माता होते, आर. चंद्रा (भारत भूषणचे मोठे भाऊ). ते खय्यामजींचे चांगले मित्र होते. पाकिस्तानी गायक फतेह अली व मुबारक अली, यांची एक कव्वाली चित्रपटात घेण्यासाठी ते आग्रही होते. खय्यामजींनी त्यांना सांगितले, की त्यापेक्षा उत्कृष्ट कव्वाली मी देईन. पण निर्माता हट्ट सोडायला तयार नव्हते. शेवटी खय्याम म्हटले, 'सॉरी, उद्या सकाळी सायनिंग रक्कम परत घेऊन जा.' आणि त्यांनी हा चित्रपट नाकारला.
तसेच 'चौदहवी का चाँद', या सुप्रसिद्ध चित्रपटावेळी, पैसे ठरवण्यावरून वाद झाला. त्यावेळी खय्यामजींनी सांगितले कि, 'माझी किंमत एवढी आहे. मी खूप कमी काम करतो. विषय आवडल्यानंतर माझी किंमत मिळाली नाही तर, माझे



कामात मन लागत नाही!' असे सांगून हा व 'आरती' नावाचा सिनेमा (निर्माता ताराचंद बडजात्या) याच कारणावरून अक्षरशः सोडला. ते म्हणायचे, 'जो भी काम किया, अपनी प्राइस पर किया. तसं नसतं तर मी चारशे चित्रपट सहज करू शकलो असतो. But I Believe in Quality?'
रमेश सैगलचा प्रसिद्ध सिनेमा, 'फिर सुबह होगी' (१९५८) हा चित्रपट खय्यामजींना मिळाला तो, फक्त एका अटीवर. ती अट म्हणजे हिरो राज कपूरला गाण्यांच्या चाली आवडायला हव्यात. पण टायटल साँगच्या त्यांनी तयार केलेल्या पाचही चाली राजजींना आवडल्या आणि चित्रपटाचा करार नक्की झाला. त्याचे संगीत म्हणजे 'खामोशी और सुकून से भरा संगीत!'
'शोला और शबनम' (१९६१) चित्रपटातील 'जाने क्या ढूँढती रहती है' या गाण्याच्या ध्वनिमुद्रणाच्या दिवशी रफींना ताप होता. तरीदेखील ते छान गायले. परंतु खय्यामजींचे समाधान होत नव्हते. या गाण्याचे अक्षरशः एकवीस टेक झाले. बाविसाव्या टेकला खय्यामजींनी 'ओके' केले. एक परिपूर्ण व दर्जेदार निर्मितीचा सतत ध्यास बाळगून होते खय्याम.
'उमराव जान'च्या चाली तर जणू आशा भोसले या असामान्य गायिकेसाठीच रचल्या होत्या, असेच वाटते. पण खय्यामजी म्हणायचे, "ये धून बनी है 'उमराव जान' के लिये. नॉट फॉर आशाजी. मी लताजींना ही गाणी देऊ शकलो असतो, पण रेखाजींची प्रमुख भूमिका असल्याने आशाजींशिवाय पर्याय नव्हता. आशाजीकी आवाजमे जो गुनगुनापन है, वो रेखाजीको सूट करता है!" आशाजींनी त्यातील गाण्याच्या सरावासाठी हवा तेवढा वेळ देण्याचे मान्य केले. मात्र खय्यामजींनी आशा दीदीला स्पष्ट शब्दांत सांगितले, की तुम्ही छानच गातात, परंतु मला आशा भोसले नको तर आय वॉन्ट उमराव जान. आप मेरी स्टाईलमे गाईये"
यातील गाणी खय्यामजींनी आशाजींकडून दीड ते दोन सूर खालच्या पट्टीत गाऊन घेतली. तीन टेक ओके झाल्यानंतर आशाजींनी चौथ्या टेकमध्ये, गाण्याला आवश्यक तो न्याय (आलाप, मुरकी व हरकत) दिला. गाणे ऐकल्यानंतर आशाजी म्हणाल्या 'मैंने ऐसी सिगींग इससे पहले कभी नहीं की, ये खय्यामही करवा सकते है'. याच टोनमध्ये इतर गाणी देखील रेकॉर्ड करण्यात आली. अँड रेस्ट इज द हिस्ट्री! आजही 'उमराव जान'ची गाणी किंवा इतर चित्रपटांच्या गाण्यांचे गारुड रसिकांवर कायम आहे. 'उमराव जान'च्या संगीतासाठी खय्याम व गायकीसाठी आशाजींना राष्ट्रीय पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.
'रझिया सुलतान' (१९८४)च्या आधी, 'कभी कभी' (१९७६)ने 'खय्याम' नावाला ग्लॅमर मिळवून दिले, ते भारताच्या घराघरात पोहोचवले. 'कभी कभी'च्या सुरावटींमध्ये कमालीची झिंग होती, लोकप्रिय होण्याचा मसाला होता. तरीही त्यात खय्यामचे वेगळेपण पुरेपूर होते. तरुण पिढीला, 'तेरे चेहरेसे नजर नहीं हटती' मधला रांगडा प्रणय आवडला होता. तर टायटल साँगच्या व 'मैं पल दो पल का'मधली शांत मेलडी युवा पिढीला सुखावून गेली होती. नंतरच्या आलेल्या सिनेमा दर सिनेमागणिक मिळालेल्या जुबिली यशाची सलगता सर्वज्ञात आहे.
आयुष्यातील प्रचंड संघर्षाच्या व अडचणीच्या काळात ते कधीच विचलित होत नसत. कारण पत्नी जगजीत कौर (गायिका)चे त्यांना त्या काळात लाभलेले सहकार्य. संगीत निर्मितीत देखील त्यांचा मोठा सहभाग राहिला. पण २०१२ मध्ये त्यांचा एकुलता मुलगा 'प्रदीप'च्या अकाली निधनाने दोघेही पार कोलमडले. त्याच्या स्मृतिप्रीत्यर्थ 'KPJ' (Khayyam / Pradip / Jagjit) नावाचा ट्रस्ट स्थापन केला. स्वतःच्या ९० व्या वाढदिवसाला (१८ फेब्रुवारी २०१६) आपली संपूर्ण संपत्ती म्हणजे सुमारे १२ कोटी रुपये या ट्रस्टला दान केले. संगीत क्षेत्रातील वादक व अन्य गरजूंसाठी हा निधी उपयोगात आणला जातो.
अनेक प्रतिष्ठीत पुरस्कारांनी सन्मानित दानी, संवेदनशील, मनस्वी व आपल्याच सिद्धांतावर जगलेल्या, थोडे दुर्लक्षीत, पण जाणकारांच्या हृदयात कायमचे वास्तव्य करणाऱ्या, खय्यामजींचे दि. १९ ऑगस्ट २०१९ रोजी मुंबईत निधन झाले. आजच्या त्यांच्या सातव्या स्मृतिदिनी श्रद्धांजली वाहताना मन कासावीस होते. त्यांच्या संगीताचा अंमल अजून कायम आहे व आम्ही देखील त्यातून बाहेर पडू इच्छित नाही, हीच त्यांना श्रद्धांजली.

**– शरद आ. सोनवणे, अमळनेर.**
**मो. : ९४२०१ ०८३०५**

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक व मालक श्री. आनंद डिगंबर महाले यांनी महातेज पब्लिकेशनसाठी अविष्कार ग्राफिक्स, प्लॉट नं. 17, रामचंद्र नगर, भुसावळ रोड, जळगाव (महाराष्ट्र) 425002 येथे छापून गट नं. 160, प्लॉट नं. 51/52, सुप्रभा अपार्टमेंट, मराठा मंगल कार्यालयाजवळ, पटवारी कॉलनी, अमळनेर, जि. जळगाव (महाराष्ट्र) 425401 येथे प्रसिद्ध केले. संपादक :- आनंद डिगंबर महाले (रजि नं. MAHBIL/25/A0192), कार्यकारी संपादक श्री. भरत रघुनाथ पाटील ( पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील.) या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व कार्यकारी संपादक सहमत असतीलच असे नाही. महातेज पब्लिकेशन तथा ग्लोबल महातेज संबंधित कोणतेही वाद तथा खटले फक्त अमळनेर न्यायालयातच चालविले जातील. संपर्क : 7711004040, 7711004242, ई-मेल : globalmahatej@gmail.com



# अनाथाश्रमात बालपण, दहावी होताच लग्न!

## अमेरिकेत एका महिलेने कशी उभारली नऊ हजार कोटींची कंपनी








**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

आयुष्यात काहीतरी साध्य करण्याची इच्छाशक्ती असते तेव्हा संघर्ष आणि आव्हाने केवळ छोटे स्पीड-ब्रेकर असतात. ही यशोगाथा अशा एका महिलेची आहे, जिचे बालपण आणि तारुण्य अत्यंत गरिबी व वंचनेत गेले. तरीही स्वबळावर काहीतरी साध्य करण्याची इच्छा नेहमीच मनात होती. एकेकाळी पाच रुपये रोजंदारीवर काम करणारी ही महिला आज अमेरिकेत स्वतःची अब्ज डॉलर्सची सॉफ्टवेअर कंपनी चालवते.

### ५ रुपये मजुरी ते सॉफ्टवेअर कंपनीच्या सीईओ

काही यशोगाथा खरोखरच प्रेरणादायी असतात, मनाला उभारी देणाऱ्या असतात आणि ज्योती रेड्डी यांची कहाणी याचे उत्तम उदाहरण आहे. ज्योती यांनी असंख्य आव्हानांचा सामना केला आणि आज एका अब्ज-डॉलरच्या सॉफ्टवेअर कंपनीच्या सीईओ बनल्या आहेत. आयुष्यात अनेक आव्हाने आली तरीही त्यांनी कधीच हार मानली नाही.

### कोण आहेत ज्योती रेड्डी?

तेलंगणातील वारंगल येथे जन्मलेल्या ज्योती रेड्डी यांचे वडील अत्यंत गरीब होते आणि आर्थिक अडचणींमुळे पाच मुलांपैकी दुसऱ्या ज्योतीला वयाच्या आठव्या वर्षी अनाथाश्रमात सोडले. येथे ज्योतीला पुरेसे अन्न आणि सरकारी शाळेत जाण्याची संधी मिळाल्या.

### १६ व्या वर्षीच लग्न झाले

तेलंगणातील रहिवासी ज्योती रेड्डींचे वडील रोजंदारीवर मजुरीचे काम करायचे. वयाच्या आठव्या वर्षी अनाथाश्रमात दाखल केलेल्या ज्योती अत्यंत खडतर परिस्थितीत लहानाच्या मोठ्या झाल्या. गरीब कुटुंबातील ५ मुलांपैकी दुसरी मुलगी ज्योतीने अनाथाश्रमात राहूनच सरकारी शाळेत शिक्षण घेतले. वयाच्या सोळाव्या वर्षी लग्न झाल्यावर ज्योती यांच्या आयुष्याला एक मोठे वळण मिळाले आणि १८ व्या वर्षापर्यंत पदरात दोन मुली होत्या.

### पाच रुपये मजुरीवर काम केले

आर्थिक परिस्थितीत हलाखीची असल्यामुळे ज्योती शेतात पाच रुपये मजुरीवर काम करू लागल्या. १९८५ ते १९९० पर्यंत असंच सुरू होतं. त्यानंतर एका सरकारी योजनेअंतर्गत शिक्षिकेची नोकरी मिळाली आणि रात्रीच्या वेळी कपडे शिवून थोडे पैसे कमवू लागली. इथून त्यांच्या आयुष्यात बदल घडू लागला, मात्र ज्योती रेड्डीने आपली परिस्थिती सुधारण्याचा निश्चय केला होता.

### शिक्षणाने नशीब बदलले

आठ-नऊ तास काम केल्यावर लोक थकून घरी येताच सोफा किंवा पलंगावर जाऊन पडता. पण, एवढं काम करूनही ज्योती आपल्या अभ्यासासाठी वेळ काढायच्या आणि केवळ शिक्षणच नव्हे तर कौशल्येही आत्मसात करण्यावर भर दिला. ज्योतीने टायपिंग शिकले आणि एका शाळेत रुजू झाल्या. १९९४ मध्ये डॉ. बी. आर. आंबेडकर ओपन विद्यापीठातून बी.ए. पदवी मिळवली आणि १९९७ मध्ये काकतीय विद्यापीठातून पदव्युत्तर शिक्षण पूर्ण केले. पुढे त्यांना शाळेतील शिक्षिका म्हणून ३९८ रुपये पगार मिळू लागला आणि मुलींनाही मिशनरी शाळेत दाखल केले. सगळं सुरळीत सुरू होतं पण, ज्योती नाखूष होत्या.

### अमेरिकन ड्रीमच्या दिशेने भरारी

या दरम्यान, ज्योतीची चुलत बहीण अमेरिकेतून परतली आणि बहिणीच्या मदतीने त्यांनी अमेरिकेला जाण्याचे ठरवले. सुरूवातीला हाताला मिळेल ते काम केले. व्हिसासाठी कार्यालय आणि न्यायालयात वारंवार जावे लागायचे पण, या दरम्यान ज्योतीच्या लक्षात आले की व्हिसासाठी लोक वाट्टेल ती किंमत मोजायला तयार होते. त्यानंतर ज्योतीने व्हिसाच्या बाबींवर सल्ला देण्यासाठी सॉफ्टवेअर विकसित केले.

### अमेरिकेत उभारले अब्जावधींचे साम्राज्य

ज्योतीकडे ना कोणती गुंतवणूक होती, ना कोणी मार्गदर्शन करणारे, कोणतीही योजना नव्हती आणि नशिबानेही साथ दिली नव्हती. पण एकेकाळी शेतात ५ रुपयांसाठी काम करणाऱ्या ज्योतीने अमेरिकेत स्वतःच्या हिमतीवर 'की सॉफ्टवेअर सोल्युशन्स' नावाची आयटी सर्व्हिस कंपनी सुरू केली. आज ज्योती अमेरिकेतील फिनिक्स शहरात स्थायिक असून अमेरिकेत सहा घरे तसेच भारतातही अनेक फ्लॅट्स आणि मालमत्ता आहेत. याशिवाय Key Software Solutions ने १२५ कोटी ते १४२ कोटी रुपयांहून जास्त कॉर्पोरेट उलाढाल आणि मूल्यांकन साध्य करून दाखविले.

# रोज-रोज पोहा और पराठे से हैं परेशान?

## ट्राई करें पालक ढोकले की आसान रेसिपी



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अगर आप नाश्ते में कुछ स्वादिष्ट और पौष्टिक बनाना चाहते हैं, तो पालक ढोकला एक अच्छा विकल्प हो सकता है। बेसन और पालक से तैयार यह ढोकला कम तेल में बनाया जा सकता है। इसमें दही, पालक, बेसन और मसालों का इस्तेमाल होता है, जबकि राई, तिल और करी पत्ते का तड़का इसका स्वाद बढ़ा देता है। इसे हरी चटनी, इमली की चटनी या दही के साथ परोसा जा सकता है।

अगर आप भी अच्छी स्वास्थ्य और लाजबाब स्वाद की तलाश कर रहे हैं, आपके लिए पालक ढोकला बेहतरीन विकल्प हो सकता हैं। बेसन और पालक का संतुलित मिश्रण इस व्यंजन को प्रोटीन, फाइबर और आयरन से भरपूर बना देता हैं। यह नाश्ते, टिफिन या शाम की हल्की भूख के लिए शानदार है। पालक ढोकला बनाने के लिए एक कप बेसन, एक कप ताजी पालक की प्यूरी, आधा कप दही, अदरक, हरी मिर्च का पेस्ट, हल्दी, नमक, चीनी, नींबू का रस और ईनो की जरूरत पड़ती है। हां तड़के के लिए राई, तिल, करी पत्ता और थोड़ा तेल जरूर रखे। ताजा सामग्री इस्तेमाल करने से स्वाद और पौष्टिकता दोगुना बढ़ जाते हैं।

सबसे पहले पालक को अच्छी तरह धोकर हल्का उबाल लेना चाहिए और ठंडा होने पर उसकी मुलायम प्यूरी (पेस्ट)तैयार करें। अब एक बड़े बर्तन में बेसन, दही और पालक का पेस्ट मिला लेना चाहिए। इसमें मसाले और अन्य सामग्री डालकर ऐसा बैटर तैयार करें, जो ज्यादा गाढ़ा हो और बहुत पतला न हो। बलिया जनपद के बांसडीह तहसील अंतर्गत केवटलिया चौबे निवासी मंटू कुमार राजभर के अनुसार, तैयार बैटर यानि घोल में ईनो मिलाना चाहिए और हल्के हाथों से चला दे। पहले से तेल लगी थाली या ढोकला प्लेट में मिश्रण रख दें। अब स्टीमर या कुकर में बिना सीटी लगाए लगभग १५ से २० मिनट तक भाप में पकाना। अब अगर टूथपिक डालने पर वह साफ बाहर आ जाए, तो समझिए ढोकला तैयार हो गया है।

तड़का लगाने से ढोकले का स्वाद काफी बढ़ जाता हैं। इसके लिए एक पैन में थोड़ा तेल गर्म कर ले। अब इसमें राई चटकाएं, फिर तिल और करी पत्ता डाल दें। तड़के को गर्मागर्म ढोकले पर एक समान फैलाएं या उसी में डालकर चला दे। चाहें तो ऊपर से बारीक कटा हुआ हरा धनिया डाल सकते हैं।

यह पालक ढोकला न केवल स्वादिष्ट होते हैं, बल्कि पोषण भी देते हैं। हालांकि, पालक में आयरन, विटामिन और एंटीऑक्सीडेंट भी पाए जाते हैं, जो शरीर को ऊर्जा देते हैं। बेसन भी प्रोटीन और फाइबर का खजाना कहा जाता हैं. यहीं कारण है कि, पालक ढोकला पचने में भी आसान होता हैं।

पालक ढोकले को हरी धनिया-पुदीना चटनी, मीठी इमली की चटनी या दही के साथ खाया जा सकता है। यह शाम की चाय को बेहतर बना सकता है। कम तेल में बनने के कारण इसे हल्का और संतुलित भोजन माना जाता है। इसका स्वाद बहुत ही आनंददायक होता हैं । तो क्या आप भी रोजमर्रा के नाश्ते में कुछ नया, पौष्टिक और स्वादिष्ट व्यंजन बनाना चाहते हैं, तो पालक ढोकला जरूर आजमाएं। इसकी आसान विधि, कम समय में और भरपूर पोषण इसे हर रसोई के लिए खास बनाते हैं। यह स्वाद और सेहत का अनोखा मेल है, जो लगभग सभी को पसंद आ सकता है। यकीन मानिए, इसका लाजवाब स्वाद आपको भी दीवाना बना देगा।

# वीज कनेक्शन न घेता फक्त सोलर पॉवरवर पूर्ण घर चालू शकते का?



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

सोलर पॉवरची लोकप्रियता ही दिवसेंदिवस वाढत आहे. सरकारही सोलर पॅनल लावण्यासाठी प्रोत्साहन देत आहे. वाढत्या विजेच्या किमती आणि पर्यावरणाविषयी वाढत्या चिंतांदरम्यान सोलर एनर्जीचा वापरही वेगाने वाढत आहे. याच कारणामुळे सरकारही लोकांना सोलर एनर्जीचा वापर करण्याचा सल्ला देत आहे. सोलर पॅनल घेताना अनेक लोकांच्या मनात प्रश्न असतो, की एखादे घर हे पूर्णपणे सोलर एनर्जीवर चालू शकते का? म्हणजेच विजेचे सरकारी कनेक्शन काढून फक्त सोलर पॅनल आणि बॅटरीच्या मदतीने फॅन, टीव्ही, फ्रीज, कूलर, लाइट आणि दुसरे डिव्हाइस चालविले जाऊ शकतात? चला जाणून घेऊया याचे पूर्ण सत्य.

**सोलर घर म्हणजे काय? :** मीडिया रिपोर्ट्सनुसार पूर्णपणे सोलर घरचा अर्थ असा होतो, की घरातील विजेची गरज ही पूर्णपणे सोलर पॅनलने पूर्ण होते. रात्री किंवा आभाळ असलेल्या वातावरणात बॅटरीच्या मदतीने विजेची गरज पूर्ण होते. अशा सिस्टीमला सामान्यतः ऑफ-ग्रिड सोलर सिस्टीम म्हटले जाते.ऑन-ग्रिड सिस्टीममध्ये सोलर पॅनलसह विजेचे सरकारी कनेक्शनही राहते. तर ऑफ-ग्रिड सिस्टीमला अशाप्रकारे डिझाईन केले जाते, की घर गरज पडल्यावर ग्रिडशिवायही चालू राहते.

**दिवसा सोलर पॅनल कशी देते वीज? :** सोलर पॅनल सूर्याच्या प्रकाशाला विजेत कन्व्हर्ट करते. दिवसात तयार होणाऱ्या विजेने घरातील डिव्हाईस चालविले जाऊ शकतात. जर त्यावेळी विजेची गरज कमी असेल तर एक्स्ट्रा वीज बॅटरीमध्ये स्टोअर केली जाऊ शकते.

**रात्री कसे चालेल घर :** १०० टक्के सोलर सिस्टीमचा सर्वांत महत्त्वाचा हाच असतो. रात्री सोलर पॅनल वीज निर्माण करीत नाही. यामुळे बॅटरीची गरज पडते. बॅटरीची क्षमता ही घरातील विजेचा वापर आणि आवश्यक बॅकअपचा कालावधी यावर अवलंबून असते. एखादे कुटुंब रात्रीच्या वेळी पंखे, लाइट, टीव्ही, रेफ्रिजरेटर आणि इतर डिव्हाईस वापरत असेल, तर त्यासाठी लहान बॅटरी पुरेशी ठरत नाही. आजच्या काळात लिथियम-आयन बॅटरी घरगुती सोलर सिस्टीममध्ये प्रसिद्ध होत आहे. कारण यांची विजेची ताकद ही चांगली असते आणि त्यांना वारंवार चार्ज केले जाऊ शकते.

**किती सोलर पॅनलची गरज असेल? :** खरेतर याचे कोणतेही ठरलेले उत्तर नाही. सिस्टीमची साइज घरातील टोटल वीज वापरावर अवलंबून असते. एखाद्या घरात महिनाभरात विजेचा वापर जास्त असेल तर जास्त ताकद असणारे सोलर पॅनल घ्यावे लागेल. पण फक्त सोलर पॅनली ताकद पाहणे पुरेसे नसते. काही महत्त्वाच्या गोष्टींकडेही लक्ष देणे गरजेचे असते. त्या गोष्टी कोणत्या पाहूया.
रोज किती युनिट वीज हवी आहे.
दिवसात किती वीज खर्च होते.
रात्री किती वीज हवी असते.
किती तासांचे बॅकअप हवे आहे.
तुमच्या परिसरात ऊन किती असते.
उन्हाळ्यात आणि हिवाळ्यात विजेचा वापर कसा असतो. यामुळे सोलर सिस्टीम लावण्यापूर्वी आधी घरातील खरा विजेचा वापर तपासणे महत्त्वाचे आहे.

**आभाळ आणि पावसात काय होईल? :** तुमचे घर पूर्णपणे सोलरवर अवलंबून असेल तर आभाळ किंवा पावसाळी वातावरण तुमच्यासाठी आव्हान ठरू शकते. खूप ऊन असेल तेव्हा पॅनल चांगल्याप्रकारे वीज तयार करते. पण पाऊस असेल तर वीज कमी तयार होते.
बॅटरी आधीच चांगल्याप्रकारे चार्ज असेल तर घरात विजेचा सप्लाय चालू राहील. पण सतत अनेक दिवस ऊन कमी असेल तर बॅटरी रिकामीही होऊ शकते. यामुळे अशा सिस्टीममध्ये बॅकअपसाठी एक्स्ट्रा बॅटरी ठेवणे अत्यंत गरजेचे असते.

**हेवी डिव्हाईससही चालवू शकता का? :** होय, पण यासाठी सिस्टीम त्या हिशेबाने डिझाईन करावी लागेल. फ्रीज, पाण्याची मोटार, कूलर, मायक्रोव्हेव, वॉशिंग मशीन आणि एअर कंडीशनरसारखे डिव्हाईस जास्त वीज वापरू शकतात. विशेषतः एसीला दीर्घकाळपर्यंत सोलरने चालविण्यासाठी मोठी सोलर ताकद आणि बॅटरी स्टोरेजची गरज पडते. त्यामुळे फक्त घरात किती डिव्हाईस आहेत हे पाहणे पुरेसे नाही. ती किती वेळ चालतात, याचा विचार करणेही महत्त्वाचे आहे.

# कच्चा लसूण खाता येत नाही? मग 'असा' आंबवून खा

## बीपी आणि कोलेस्ट्रॉलसाठी ठरू शकतो फायदेशीर... काय सांगतात तज्ज्ञ?



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

ब्लड प्रेशर आणि रक्तवाहिन्यांमध्ये कडकपणा असेल तर तुम्हाला हार्ट अटॅकचा धोका इतर लोकांपेक्षा ४ पट जास्त असतो. रक्तवाहिन्यांची समस्या असो वा कोलेस्ट्रॉल कंट्रोलमध्ये ठेवणं असो, यावर नियंत्रण मिळवण्यासाठी लसूण उत्तम पर्याय ठरू शकतो. लसूण हा स्वयंपाकघरातला असा मसाला आहे जो स्वयंपाकातच नाही तर अनेक आजारांवरील घरगुती उपाय आहे. आयुर्वेदात लसूण हा एक उत्तम औषध मानला जातो, मात्र त्याची तिखट चव सर्वांना आवडतेच असं नाही. त्याच्या चवीमुळे लोक तो कच्चा खाणे टाळतात, पण जेवणात त्याचा वापरही कमी करतात.

आयुर्वेद आणि युनानी औषध तज्ज्ञ डॉ. सलीम झैदी यांनी लसूण खाण्याची सर्वोत्तम पद्धत सांगितली आहे. त्यामुळे रक्तवाहिन्यांमधील अडथळा नियंत्रणात राहील आणि ब्लड प्रेशर नॉर्मल राहील. लसूण खाल्ल्याने कोलेस्ट्रॉल कमी होऊ हृदयाचे आरोग्यही सुधारेल. डॉ. सलीम यांनी सांगितले की, आंबवलेला लसूण खाल्ल्यास त्याचे अधिक फायदे मिळू शकतात. आंबवल्यानंतर त्याची चव आणि वास दोन्ही सौम्य होतात, तर त्यातील काही जैव-सक्रिय घटक आणखी सक्रिय होऊ शकतात. तर मग जाणून घेऊया कच्चा लसूण खाण्याचे आरोग्यदायी फायदे काय आहेत आणि आंबवलेला लसूण आजारांवर प्रभावीपणे कसा उपचार करतो.

### कच्चा लसूण फायदेशीर, पण त्याचे सेवन कसे करायचे?

अनेक जण सकाळी रिकाम्या पोटी कच्चा लसूण खातात, पण प्रत्येकाला त्याची तिखट चव आवडत नाही. काहींना तो खाल्ल्यानंतर तोंडात जळजळ, तीव्र वास, ढेकर, पित्त, पोटात जळजळ किंवा मळमळ यासारख्या समस्या जाणवू शकतात. यामुळे बरेच जण काही दिवसांनी त्याचे सेवन करणे थांबवतात. लसूण आरोग्यासाठी एक आवश्यक मसाला आहे. त्यात अनेक बायोॲक्टिव्ह संयुगे असतात. ते शरीरासाठी फायदेशीर मानले जातात. त्याचे नियमित आणि संतुलित प्रमाणात सेवन केल्याने ब्लड प्रेशर नियंत्रित ठेवण्यास मदत होते. तसेच ते खराब कोलेस्ट्रॉल (एलडीएल) आणि ट्रायग्लिसराइडची पातळी कमी करण्यास मदत करू शकते. याव्यतिरिक्त लसूण रक्तवाहिन्यांचे कार्य सुधारण्यास, रोगप्रतिकारशक्ती वाढवण्यास आणि शरीरातील सूज कमी करण्यास मदत करू शकतो. लसूण फायदेशीर आहे, मात्र जर तो खाणे शक्यन नसेल तर तुम्ही तो आंबवून त्याचे सेवन करू शकता.

### आंबवलेल्या लसणाचे फायदे

आंबवलेला लसूण म्हणजे जो काही आठवड्यांसाठी मिठाच्या पाण्यात साठवून ठेवला जातो. त्यामुळे नैसर्गिक आंबवण्याची प्रक्रिया सुरू होते. या प्रकियेदरम्यान लसणाची चव पूर्ववींपेक्षा सौम्य आणि किंचित गोड होऊ शकते. त्याचा वासही कमी होतो आणि त्याचा पोत मऊ होतो. डॉ. सलीम यांनी स्पष्ट केले की, लसूण आंबवल्याने त्यातील काही जैव-सक्रिय संयुगांची क्रियाशीलता वाढू शकते, त्यामुळे शरीर त्यांना अधिक चांगल्या प्रकारे शोषून घेऊ शकते.
अनेक अभ्यासांमधून असे दिसून आले की, आंबवलेल्या लसणामध्ये अँटीऑक्सिडंट क्रियाशीलता वाढलेली असू शकते. तसंच आंबवलेला लसूण कच्च्या लसणापेक्षा तीन ते चार पट अधिक प्रभावी आहे किंवा तो रक्तवाहिन्यांमधील अडथळे दूर करू शकतो.

### घरी आंबवलेला लसूण कसा तयार करायचा?

आंबवलेला लसूण तयार करण्यासाठी सर्वात आधी १५ ते १६ लसणाच्या पाकळ्या सोलून स्वच्छ धुवा. त्या एका स्वच्छ काचेच्या बरणीत ठेवा. १ लिटर पाण्यात ४ मोठे चमचे मीठ पूर्णपणे विरघळवून खारवण्याचे ब्राइन तयार करा. बरणीत लसणाच्या सर्व पाकळ्या पूर्णपणे बुडतील इतके पाणी घाला. त्यानंतर त्यात सुमारे १ छोटा चमचा व्हिनेगर घाला आणि बरणीचे झाकण घट्ट बंद करा. बरणी सामान्य तापमान असलेल्या आणि थेट सूर्यप्रकाशापासून दूर असलेल्या ठिकाणी - ठेवा. आंबवण्याच्या प्रक्रियेदरम्यान, बरणीत वायू तयार होतो, म्हणून दर २ ते ३ दिवसांनी तो वायू बाहेर जाण्यासाठी झाकण थोडे सैल करा. या प्रक्रियेदरम्यान लसूण तपकिरी किंवा जांभळा होऊ - शकतो. हे सामान्य आहे. आंबवलेला लसूण तयार होण्यासाठी साधारणपणे ३० ते ४५ दिवस लागतात. काही लोक तर तो ६० ते ९० दिवसांपर्यंत आंबवतात. जास्त काळ आंबवल्याने चवीत बदल होऊ शकतो.

### आंबवलेला लसूण कसा खावा?

जर तुम्ही पहिल्यांदाच आंबवलेला लसूण खात असाल, तर फक्त एका पाकळीने सुरूवात करा. प्रत्येक पाकळीवर शरीर कशी प्रतिक्रिया देते याचे निरीक्षण करा. जर तुमच्या शरीराला कोणतीही समस्या जाणवली नाही, तर तुम्ही पाकळ्यांची संख्या २ किंवा ३ पर्यंत वाढवू शकता. हे रिकाम्या पोटी घ्यावे की जेवणानंतर याबाबत डॉक्टरांचा सल्ला घ्या.

### कोणती सावधगिरी बाळगावी?

जर तुम्ही वॉरफेरिन, एपिक्साबान, रिव्हॅरॉक्सबॅन, क्लोपिडोग्रेल यांसारखी रक्त पातळ करणारी औषदे किंवा ॲस्पिरिनचा हाय डोस घेत असाल, तर आंबवलेला लसूण किंवा इतर कोणताही पदार्थ मोठ्या प्रमाणात सेवन करण्यापूर्वी डॉक्टरांचा सल्ला घ्या. लसणामुळे रक्त पातळ होण्याचा परिणामदेखील होऊ शकतो, त्यामुळे काही लोकांमध्ये रक्तस्त्राव होण्याचा धोका वाढू शकतो. ज्या लोकांना लसणाची ॲलर्जी आहे किंवा ज्यांचे पोट संवेदनशील आहे, त्यांनी देखील लसूण खाताना सावधगिरी बाळगावी. लसूम सेवन केल्यानंतर तुम्हाला खाज सुटणे, सूज येणे, श्वास घेण्यास त्रास होणे किंवा पोटाच्या गंभीर समस्या जाणवल्यास त्याचे सेवन ताबडतोब थांबवा आणि डॉक्टरांचा सल्ला घ्या.




# आता होणार महिनाभर लक्ष्मीकृपा!

## बुधाच्या अस्तामुळे 'या' ४ राशींची लॉटरी; तिजोरीतील सोन्यात होणार वाढ

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

***ग्रहांचा राजकुमार बुध याचा मंगळवार, दि. १८ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी ५ वाजून ५ मिनिटांनी कर्क राशीत अस्त झाला आहे. तो दि. १८ सप्टेंबर २०२६ पर्यंत याच अवस्थेत राहणार आहे. बुधाचे अस्त होणे ४ राशींसाठी खूप फायदेशीर ठरणार आहे. या राशींच्या लोकांना करिअरमध्ये प्रगती करण्याच्या संधी मिळतील. आर्थिक स्थिती आधीपेक्षा मजबूत होईल. नवीन नोकरी मिळण्याची शक्यता आहे. चला जाणून घेऊया बुध अस्त झाल्यामुळे कोणत्या राशींना मोठा फायदा होणार आहे.***





**मिथुन : व्यवसायात मोठे यश**

या राशीच्या लोकांसाठी बुधाचे अस्त होणे फायदेशीर ठरणार आहे. करिअरमध्ये प्रगतीच्या नवीन संधी मिळतील. व्यवसायात मोठे यश मिळेल. भागीदारीच्या कामातून चांगला फायदा होईल. उत्पन्न वाढण्याची शक्यता आहे. प्रवासातूनही चांगला फायदा मिळू शकतो. या काळात तुमचे बोलणे खूप प्रभावी राहील. त्याच्या जोरावर तुम्ही करिअरमध्ये मोठे यश मिळवू शकता.



**सिंह : अडकलेले पैसे मिळतील**

या राशीच्या लोकांसाठी बुधाचे अस्त होणे फायदेशीर ठरेल. तुमची नेतृत्व करण्याची क्षमता मजबूत होईल. करिअरमध्ये मोठे यश मिळेल. अडकलेले पैसे परत मिळू शकतात. जुन्या गुंतवणुकीतून चांगला फायदा होण्याची शक्यता आहे. आर्थिक स्थिती चांगली राहील. कामाच्या ठिकाणी सकारात्मक परिणाम मिळतील. बॉससोबतचे संबंधही मजबूत होतील.



**तूळ : व्यवसायातून चांगली कमाई होईल**

या राशीच्या लोकांसाठी बुधाचे अस्त होणे शुभ ठरेल. गुंतवणुकीतून चांगला फायदा मिळेल. व्यवसायातून चांगले पैसे कमावण्यात यश मिळेल. जमीन खरेदी करण्याचा विचार होऊ शकतो. मनासारखी नोकरी मिळण्याची शक्यता आहे. एखाद्या कामात मोठे यश मिळू शकते. व्यवसायातील मोठी डील निश्चित होऊ शकते. अनेक मार्गांनी पैसे मिळण्याची शक्यता आहे.



**मीन : चांगली कमाई करण्यात यश मिळेल**

या राशीच्या लोकांना करिअरमध्ये मोठे यश मिळेल. चांगले पैसे कमावण्यात यश मिळेल. नोकरीत प्रमोशन मिळण्याची शक्यता आहे. भागीदारीच्या कामातून चांगला फायदा होऊ शकतो. उच्च शिक्षणाशी संबंधित लोकांना मोठे यश मिळेल. आई-वडिलांच्या मदतीने एखादे मोठे काम पूर्ण करू शकता. नवीन नोकरीच्या ऑफर्स मिळू शकतात. जमीन किंवा वाहन घेण्याचा योगही बनू शकतो.

# घरात हत्तीची जोडी ठेवावी की नाही?

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

अनेकदा लोक घर सुंदर दिसण्यासाठी किंवा सकारात्मक ऊर्जेसाठी विविध प्रकारच्या वस्तू आणि मूर्ती घरात ठेवतात. वास्तुशास्त्रानुसार काही विशिष्ट वस्तू घरात ठेवल्याने नकारात्मक ऊर्जा दूर होऊन सुख-शांतीचा वास होतो. यापैकीच एक म्हणजे हत्तीची जोडी. अनेकांचा असा प्रश्न असतो की घरात हत्तीची जोडी ठेवावी की नाही? वास्तुशास्त्रानुसार घरात हत्तीची जोडी ठेवणे अत्यंत शुभ मानले जाते. जर तुम्ही नवीन घर किंवा फ्लॅट खरेदी करण्याचा विचार करत असाल, तर वास्तूच्या या नियमांकडे दुर्लक्ष करू नका.

**घरात हत्तीची जोडी ठेवल्याने काय होतो फायदा?**

**नात्यांमध्ये गोडवा :** वास्तुशास्त्रानुसार घरात हत्तीची जोडी ठेवल्यास पती-पत्नीमधील प्रेम, आपुलकी आणि ताळमेळ वाढतो.

**अडकलेली कामे पूर्ण :** घरातील नकारात्मक ऊर्जा दूर होऊन थांबलेली किंवा अडकलेली कामे लवकर पूर्ण होतात.

**लक्ष्मीची कृपा :** हत्तीची जोडी घरात ठेवल्याने माता लक्ष्मीचा आशीर्वाद मिळतो आणि कुटुंबातील सदस्यांमध्ये एकता व सन्मान टिकून राहतो.

**वास्तुशास्त्रातील हत्तीचे आध्यात्मिक महत्त्व**

वास्तुशास्त्रात हत्तीला विशेष स्थान देण्यात आले आहे. हत्ती हे विघ्नहर्ता भगवान श्रीगणेश यांचे रूप आणि देवराज इंद्रांचे वाहन ऐरावत यांचे प्रतीक मानले जाते. ज्याप्रमाणे हत्ती आपल्या भक्कम पायांवर जमिनीवर स्थिर उभा राहतो त्याचप्रमाणे घरात हत्तीची जोडी ठेवल्यास करिअर आणि व्यवसायात स्थैर्य येते. याशिवाय हत्ती घरातील सदस्यांचे वाईट नजरेपासून संरक्षण करतो.

**हत्तीची जोडी कोणत्या दिशेला ठेवावी ?**

हत्तीच्या जोडीचा योग्य लाभ मिळविण्यासाठी ती योग्य दिशेला ठेवणे अत्यंत आवश्यक आहे. चुकीच्या दिशेला ठेवल्यास फायद्याऐवजी नुकसान होऊ शकते. **उत्तर-पूर्व (ईशान्य दिशा) :** घरात सुख, समृद्धी आणि शांतता टिकवून ठेवण्यासाठी हत्तीची जोडी ईशान्य किंवा उत्तर-पूर्व दिशेला ठेवावी.
**उत्तर दिशा :** आर्थिक प्रगती आणि करिअरमध्ये यश मिळविण्यासाठी हत्तीची जोडी उत्तर दिशेला ठेवावी. उत्तर दिशा ही धनकुबेराची दिशा मानली जाते. **दक्षिण दिशा टाळा :** हत्तीची मूर्ती किंवा जोडी कधीही दक्षिण किंवा नैऋत्य दिशेला ठेवू नये.

**कोणत्या प्रकारची हत्तीची जोडी खरेदी करावी?**

नेहमी खरेदी करताना सोंड वरच्या दिशेला असलेल्या हत्तीची जोडी निवडावी. सोंड वर असलेला हत्ती यश आणि सकारात्मकतेचे प्रतीक असतो. सोंड खाली असलेला हत्ती अनेकदा वैराग्य किंवा उदासीनतेचे प्रतीक मानला जातो.

**पितळेचा हत्ती :** व्यापार, व्यवसाय आणि धनवृद्धीसाठी पितळेच्या हत्तीची जोडी सर्वोत्तम मानली जाते.

**चांदीचा हत्ती :** मनाच्या शांतीसाठी आणि कुंडलीतील चंद्रदोष दूर करण्यासाठी उत्तर दिशेला किंवा तिजोरीत चांदीचा हत्ती ठेवावा.

**लाकडी हत्ती :** घरात स्थैर्य, मानसिक शांतता आणि सकारात्मक वातावरण निर्माण करण्यासाठी लाकडी हत्ती उत्तम ठरतो.

वास्तुशास्त्रानुसार हत्तीची जोडी ठेवताना ती तुटलेली, खंडित किंवा धूळ बसलेली नसावी याची काळजी घ्यावी.



# 'या' ५ राशींसाठी पुढचे ३० दिवस अत्यंत कठीण!

## सूर्य-केतूची अशुभ युती; पैसा सांभाळा, नोकरीत मतभेद, प्रेमात वाद...

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

ते म्हणतात ना, माणसावरील संकट कधीच सांगून येत नाही. मात्र, ज्योतिषशास्त्रानुसार पाहायला गेले तर ग्रहांची स्थिती व्यक्तीच्या जीवनावर मोठा परिणाम करते. नुकतेच दि. १७ ऑगस्ट रोजी सूर्य आणि केतू यांची अशुभ युती बनली आहे. ज्यामुळे पुढील ३० दिवसांसाठी ५ राशींना विविध अडचणींचा सामना करावा लागू शकतो.

सूर्य-केतू युतीने अत्यंत अशुभ योग बनला...

ज्योतिषशास्त्रानुसार जेव्हा सूर्य आणि चंद्र राहू आणि केतूसोबत युतीत असतात तेव्हा ग्रहण होते. पंचांगानुसार सकाळी ८:०३ वाजता सूर्याने कर्क राशीतून सिंह राशीत प्रवेश केला. सूर्याने सिंह राशीत प्रवेश करताच सूर्यग्रहण सक्रिय झाले आहे. केतू आधीच सिंह राशीत आहे आणि सूर्याच्या सिंह राशीतील प्रवेशामुळे सूर्य-केतू युती निर्माण झाली आहे. ज्योतिषशास्त्रानुसार सूर्य-केतू युतीमुळे सूर्यग्रहण होते, जे एक अत्यंत अशुभ योग मानले जाते. सूर्य दि. १७ सप्टेंबर २०२६ पर्यंत सिंह राशीत राहील. या महिन्यात पाच राशींना काही बाबतीत अडचणी येऊ शकतात.




सूर्यग्रहण योगाचे परिणाम

ज्योतिषशास्त्रानुसार सूर्य आणि केतूच्या युतीने तयार झालेला ग्रहण योग आत्मविश्वास, मान-सन्मान, वडिलांचे आरोग्य आणि शासकीय कामात अडथळा आणतो. सूर्य या सर्वांचा कारक आहे, तर केतू अलिप्तता, गूढता आणि अचानक होणाऱ्या बदलांचा कारक आहे. त्यामुळे हा योग अस्वस्थता आणि गोंधळ देखील निर्माण करतो. व्यक्तीला करिअरमध्ये किंवा घरात आव्हानांना सामोरे जावे लागू शकते. जाणून घ्या की सूर्यग्रहण योगाच्या या एका महिन्यात कोणत्या राशींना सर्वाधिक त्रास होऊ शकतो.

**मिथुन**

ज्योतिषशास्त्रानुसार सूर्यग्रहण योगामुळे मिथुन राशीच्या लोकांना त्यांच्या नोकरी आणि व्यवसायात आव्हाने वाढू शकतात. विशेषतः जे आपल्या कामात निष्काळजी राहिले आहेत, त्यांच्यासाठी ही अत्यंत सावधगिरी बाळगण्याची वेळ आहे. कामाच्या ठिकाणी बॉससोबत वाद होण्याची शक्यता आहे. अशा परिस्थिती टाळणे उत्तम. व्यावसायिकांनी नवीन सौद्यांमध्ये घाई करणे टाळावे.

**कर्क**

ज्योतिषशास्त्रानुसार कर्क राशीच्या लोकांसाठी, सूर्य-केतू युतीमुळे कुटुंबातील सदस्यासोबत वाद होऊ शकतो. वडीलधाऱ्यांशी चांगले वागा. एखादा जुना मुद्दा पुन्हा उफाळून येऊ शकतो. योग्य गोष्ट चुकीच्या पद्धतीने बोलल्यामुळे तुम्ही अडचणीत येऊ शकता. मोठे आर्थिक निर्णय घेणे टाळा.

**सिंह**

ज्योतिषशास्त्रानुसार, सिंह राशीत सूर्य-केतू युती झाली आहे आणि या राशीच्या लोकांसाठी अनेक समस्या निर्माण करू शकते. तुमचा आत्मविश्वास कमी होऊ शकतो आणि तुमचा अहंकार वाढू शकतो. तुम्ही भ्रमात पडू शकता. तुमचे किंवा तुमच्या वडिलांचे आरोग्य खालावू शकते. तुम्हाला करिअरमध्ये मोठ्या आव्हानाचा सामना करावा लागू शकतो.

**वृश्चिक**

ज्योतिषशास्त्रानुसार वृश्चिक राशीच्या लोकांसाठी करिअरच्या दृष्टीने हा एक महत्त्वाचा काळ आहे. तुम्हाला दिलेले कोणतेही काम पूर्ण जबाबदारीने आणि सावधगिरीने पूर्ण करा. तुम्हाला अधिक मेहनत करावी लागू शकते, परंतु यामुळे अपयश येणार नाही. सहकाऱ्यांसोबत वाद घालणे टाळा. व्यावसायिकांनी कागदपत्रांमध्ये चुका करणे टाळावे.

**कुंभ**

ज्योतिषशास्त्रानुसार कुंभ राशीसाठी सूर्य-केतू युती काही बाबींमध्ये अडचणी दर्शवते. काही लोकांना आर्थिक नुकसान होऊ शकते. जोपर्यंत तुम्ही स्वतः कागदपत्रांची पडताळणी करत नाही, तोपर्यंत त्यावर सही करू नका किंवा फायली हलवू नका. चुका करणे टाळा. खर्च वाढू शकतो.

# १७ सप्टेंबरपर्यंत 'या' राशींसाठी पैसाच पैसा

## द्विद्वादश राजयोगाने गरिबीतून वर येणार, संपत्तीतही होईल भरभराट

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

वैदिक ज्योतिषशास्त्रानुसार ग्रहांचा राजा सूर्य आणि देवांचा गुरू गुरु यांच्या स्थितीला विशेष महत्त्व आहे. सोमवार, दि. १७ ऑगस्ट रोजी सूर्याने स्वतःच्या राशीत, सिंह राशीत प्रवेश केला, जेथे तो दि. १७ सप्टेंबरपर्यंत राहील. सूर्याने सिंह राशीत प्रवेश केल्यामुळे, गुरु आणि सूर्य यांच्यात द्विदश योग तयार झाला आहे. या स्थितीत गुरू सूर्यापासून बाराव्या घरात आणि सूर्य गुरूपासून दुसऱ्या घरात असेल.

ज्योतिषशास्त्रानुसार सूर्य आणि गुरू यांच्यात मैत्रीचे नाते आहे. सूर्य सन्मान, नेतृत्व आणि आत्म्याचे प्रतीक आहे, तर गुरू ज्ञान, धर्म आणि विकासाचे प्रतीक आहे. सूर्य सिंह राशीत प्रवेश करतो तेव्हा तयार होणारा हा द्विद्वदश योग अनेक राशींसाठी अत्यंत शुभ ठरेल आणि समृद्धी व प्रगती आणेल. चला जाणून घेऊया की कोणत्या राशींना याचा सर्वाधिक फायदा होईल.

**मेष**

सूर्य आणि गुरूची ही युती मेष राशीसाठी विशेषतः फलदायी ठरेल. कामाच्या ठिकाणी तुमच्या नेतृत्व कौशल्याचे कौतुक होईल. पदोन्नती आणि पगारवाढीची दाट शक्यता आहे. नवीन व्यावसायिक करार व्यावसायिकांसाठी फायदेशीर ठरतील. उत्पन्नाचे नवीन स्रोत निर्माण होतील. अचानक आर्थिक लाभ होण्याची शक्यता आहे. ज्यामुळे तुमची आर्थिक स्थिती लक्षणीयरीत्या मजबूत होईल. तुमचा सामाजिक दर्जा वाढेल. तुम्हाला वरिष्ठांकडून पूर्ण पाठिंबा मिळेल.

**सिंह**

सूर्य तुमच्या राशीत भ्रमण करत आहे. ज्यामुळे तुमच्यात आत्मविश्वास आणि तल्लखपणा नव्याने संचारत आहे. तुमची निर्णयक्षमता सुधारेल. रखडलेल्या कामाला गती मिळेल. तुम्ही गमावलेला निधी परत मिळवू शकता. नवीन गुंतवणुकीमुळे भविष्यात लक्षणीय आर्थिक लाभ होण्याची शक्यता आहे. कुटुंबात शुभ प्रसंग घडू शकतात. तुम्हाला तुमच्या वडीलधाऱ्यांकडून मार्गदर्शन आणि आशीर्वाद मिळतील.

**धनू**

स्वतः गुरू ग्रहाचे अधिपत्य आहे. सूर्याचे हे गोचर तुमच्यासाठी अत्यंत भाग्यवान ठरेल. प्रलंबित कामे सहजपणे पूर्ण होतील. धार्मिक आणि आध्यात्मिक कार्यांमधील तुमची आवड वाढेल. स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांना चांगली बातमी मिळू शकते. परदेशाशी संबंधित काम किंवा व्यवसायात मोठे यश मिळेल. सुखसोयींमध्ये वाढ होईल आणि कुटुंबात आनंदी वातावरण राहील.

# नाथसंप्रदाय अन् महाराष्ट्रातील परंपरा : श्रावणातील चिंतन

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

नाथ संप्रदाय विशेषतः महाराष्ट्रातील मढी, मायंबा आणि अशा अनेक पवित्र स्थळांशी जोडलेला आहे. त्यानिमित्ताने श्रावणात भक्तगण मोठ्या श्रद्धेने नाथ संप्रदायाच्या संतांचे स्मरण करतात. नाथ संप्रदायाला थोर परंपरा लाभलेली आहे. मुळात नाथ संप्रदाय हा योग, तपश्चर्या, आत्मशुद्धी आणि गुरू-शिष्य परंपरेचा महान वारसा असलेला भारतीय आध्यात्मिक संप्रदाय आहे. याची मूळ नाळ आदिनाथ किंवा भगवान शंकर यांच्याकडे जाते. त्यानंतर मत्स्येंद्रनाथ, गोरक्षनाथ यांच्याद्वारे ही परंपरा फुलली आणि भारतभर विस्तारली. या नाथ संप्रदायाची मूळे योगमार्गात खोलवर आहेत. हठयोग, काया-साधना, प्राणायाम, मुद्रा, ध्यान इत्यादींचा वापर करून साधक आत्मोन्नतीकडे वाटचाल करतो. ' शिव म्हणजे गुरू ' हे तत्त्व या संप्रदायाचे मूलभूत आहे. महाराष्ट्रात नाथ परंपरेचा विशेष प्रभाव जाणवतो. महाराष्ट्रात नाथ संप्रदायाचे आगमन साधारणतः ९ व्या-१० व्या शतकात झाले. येथे गोरक्षनाथ, चौरंगीनाथ, रेवानाथ, जालंधरनाथ, भर्तृहरिनाथ यांसारख्या अनेक सिद्धनाथ योग्यांची परंपरा नांदली. या परंपरेतील ज्ञानेश्वर माऊली यांचे गुरू ' निवृत्तिनाथ ' हे देखील नाथ संप्रदायाशी निगडित होते. ज्ञानेश्वरी, अमृतानुभव इत्यादींमध्येही नाथ विचारधारेचे प्रतिबिंब त्यामुळे दिसते. या परंपरेचा ठसा संतश्रेष्ठ नामदेव, संत चोखामेळा, संत गोरोबा काका, भानुदास, मुक्ताबाई आदी संतांवरही दिसतो.
अहिल्यानगर जिल्ह्यातील मढी आणि मायंबा सारखी नाथ परंपरेची जपलेली ठिकाणे आजही त्याची साक्ष देतात.

अहिल्यानगर जिल्ह्यातील पाथर्डीजवळील मढी हे सिद्धनाथ महाराजांचे क्षेत्र म्हणून ओळखले जाते. सिद्धनाथ हे गोरक्षनाथांच्या परंपरेतील महान योगी मानले जातात. येथे सिद्धनाथांचा गड आहे आणि श्रावण व माघ पौर्णिमेला



येथे मोठी यात्रा भरते. श्रावणात विशेषतः सोमवारी येथे हजारो भक्त दर्शनासाठी येतात. या संपूर्ण परिसरात आध्यात्मिक शांतता, योगाभ्यास आणि नाथ संप्रदायाशी संबंधित तांत्रिक व उपासना परंपरा आढळतात. तर मायंबा देवी स्थान हेही नाथ संप्रदायाशी संबंधित स्त्री साधिकांचे स्थान मानले जाते. मायांबा हे स्थान योगिनी उपासनेचे केंद्र आहे. अनेक नाथ साधक येथे तपश्चर्या करीत असत. या देवीचे रूप नाथ परंपरेतील ' शक्ती 'चे प्रतीक मानले जाते. येथेही श्रावणात दर सोमवारी विशेष अभिषेक, जप आणि दर्शन यात्रांचे आयोजन होते. त्यामुळेच श्रावण मास आणि नाथ परंपरेचे विशेष नाते असल्याचे दिसून येते.
श्रावणात शिव उपासना विशेष फलदायी मानली जाते. नाथ संप्रदायात भगवान शंकराला ' आदिनाथ ' मानले जात असल्याने हा महिना त्यांच्यासाठी अधिक पूजनीय ठरतो. अनेक साधक या काळात जप, तप, योगाभ्यास, मौनव्रत, उपवास आदी करून आत्मशुद्धीकडे प्रयत्न करतात. मढी, मायांबा, जालंधरनाथ, रेणुका देवी, पाथर्डी परिसरातील अनेक ठिकाणी दर सोमवारी व श्रावण पौर्णिमेला भजन, कीर्तन, गोंधळ, अभिषेक, शंखध्वनी यांचे आयोजन होते.
कोपरगाव तालुक्यातील धामोरी (जि. अहिल्यानगर) येथील गोरख चिंचेचा वृक्ष सुद्धा याच नाथ संप्रदायाशी संदर्भित आहे, आणि या संदर्भाला स्थानीय लोकपरंपरा, श्रद्धा आणि मौखिक इतिहास यामधून विशेष महत्त्व आहे. गोरक्षनाथांचा महाराष्ट्रातील जो संचार होता त्यातून या कथा सर्वानाच परिचित आहेत. अनेक ग्रंथ, पोथ्यांत तसा उल्लेखही आहे. नाथ संप्रदायाचे प्रमुख संत गोरक्षनाथ (गोरखनाथ) हे सिद्धयोगी होते. त्यांचा महाराष्ट्रात विशेष संचार व प्रभाव होता. परंपरेनुसार गोरक्षनाथांनी मढी (सिद्धनाथ क्षेत्र), तिरुपती (तिरुपती बालाजीच्या परिसरात), त्र्यंबकेश्वर, औंढा नागनाथ, वणी (सप्तशृंगी), पंढरपूर, वेरूळ आणि कोपरगाव तालुक्यातील विविध स्थळे येथे योग-साधना, ध्यान आणि लोकांशी संवाद केला होता. धामोरी गावातील गोरख चिंच म्हणून ओळखला जाणारा मोठा चिंचेचा वृक्ष गोरक्षनाथांच्या वास्तव्याशी संबंधित असल्याचे स्थानिक लोक मानतात. गोरखनाथांनी या चिंचेच्या वृक्षाखाली तपश्चर्या किंवा विश्रांती घेतली, अशी आख्यायिका आहे. स्थानिक पातळीवर हा वृक्ष पवित्र मानला जातो. अनेक लोक येथे प्रार्थना, नवस, आणि योगसाधना करताना दिसतात. नाथ पंथाच्या साधकांची येथे वस्ती असून, अनेक भाविक या ठिकाणी आवर्जून भेटी देतात. काही जुन्या साधकांनी आणि स्थानिक कथांनुसार नाथपंथीय योगी धामोरी येथील या स्थळी साधनेसाठी येत असत. या ठिकाणी विशिष्ट प्रकारचा ऊर्जा प्रवाह, शांतता आणि आध्यात्मिकता जाणवते, असे अनुभवी साधक सांगतात.

चिंच वृक्ष हा नाथ परंपरेत अनेकदा तपश्चर्येचे साक्षीस्थळ म्हणून ओळखला जातो. याचे पान, सावली, आणि दीर्घायुषी स्वरूपामुळे त्याला स्थैर्य, सातत्य व ज्ञानप्राप्तीचे प्रतीक मानले जाते. धामोरी येथील गोरख चिंचेचा वृक्ष हा केवळ एक वृक्ष नसून, नाथ परंपरेतील गोरक्षनाथांच्या वास्तव्याचे आणि अध्यात्मिक ऊर्जेचे प्रतीकस्थळ मानले जाते. ही सर्वच ठिकाणी श्रावण महिन्यात, विशेषतः सोमवारी किंवा पौर्णिमेस भक्तमंडळी भेट देतात, गोरक्षनाथांचे स्मरण आणि साधना करणे हे अत्यंत फलदायी मानले जाते.
नाथ संप्रदायाचे वैशिष्ट्यपूर्ण सिद्धांत मानले गेल्याचे दिसून येते. गुरू-शिष्य परंपरा हा त्यातील एक भाग. गुरू ही सर्वोच्च सत्ता आहे. ज्ञानाचा, साधनेचा मार्ग केवळ गुरूच्या कृपेमुळेच सुकर होतो. बाह्य कर्मकांडापेक्षा अंतर्मुख होऊन आत्मसाक्षात्कार मिळवणे. शरीर हेच साधन, म्हणून त्याची शुद्धता आवश्यक असल्याने हठयोग व शारीरिक सुदृढता लाभते. संसारात राहूनही आसक्तीशून्य राहणे ही नाथांची एक शिकवण होती. नाथ संप्रदाय ही केवळ एक धार्मिक चळवळ नसून, ती एक जीवित तत्त्वज्ञानाची परंपरा आहे. आजच्या धकाधकीच्या काळात या परंपरेतून योग, संयम, निष्ठा, शारीरिक व मानसिक आरोग्य यांचे मूल्य शिकायला मिळते. श्रावण हा महिना या परंपरेचे स्मरण करून साधनेसाठी सर्वोत्तम काळ आहे. मढी, मायांबा आणि परिसरातील नाथ परंपरेच्या स्थानांना भेट देणे, भक्तिभावाने सेवा करणे हे केवळ अध्यात्मिक नाही तर सांस्कृतिक पुनरुज्जीवनाचे कार्य ठरते. नाथ संप्रदायाच्या उपासनेसाठी श्रावण महिना म्हणजे शिवत्वाच्या शोधात निघालेल्या साधकांसाठी एक अमोल संधीच आहे, असे म्हणावे लागेल.

**(वरील माहिती विविध धर्मग्रंथ, समाजमाध्यमे अर्थात सोशल मीडियावरून संकलीत केली आहे.)**